पाहिजे *v.* to want

पुरे *adv.* enough

पोळी, पोळ्या *f. chapati* (flat bread of wheat flour)

VOCABULARY

फक्त *adv.* only
बस/बास *adv.* enough
भात *m.* cooked rice
मीटर, मीटर *m.* meter
लाडू, लाडू *m.* a ball-shaped sweet, usually made of a mixture of sugar, roasted flour, and spices
लिटर, लिटर *m.* liter
शेंगदाणा, शेंगदाणे/शेंगादाणे *m.* peanut
सफरचंद, सफरचंदं *n.* apple
सुहास *m.* Suhas (a given name)
हवं *v.* to want

Phrases

सुहासला	to Suhas
उमाला	to Uma
बाबांना	to Baba
मुलांना	to the children
अप्पांना	to Appa
कोणत्या रंगाचं	of what color

Fractions and mixed numbers

पाव	one fourth
अर्धे*	one half
पाऊण	three fourths
एक	one
सव्वा	one and one fourth
दीड	one and one half
पावणे दोन	one and three fourths
दोन	two
सव्वा दोन	two and one fourth
अडीच	two and one half
पावणे तीन	two and three fourths
तीन	three
सव्वा तीन	three and one fourth
साडे तीन	three and one half
पावणे चार	three and three quarters
चार	four
सव्वा चार	four and one quarter
साडे चार	four and one half
पावणे पाच	four and three quarters
पाच	five

PRACTICE

A. Give the indirect object pronoun corresponding to each subject pronoun below.

१. (तू) तुला
२. (आम्ही) आम्हाला
३. (मी) मला
४. (ते *pl.*) त्यांना
५. (ती *sg.*) तिला
६. (तो) त्याला

---

* **अर्धे** is treated as a variable adjective. Other numbers are invariable.

७. (त्या) त्यांना

८. (तुम्ही) तुम्हाला

९. (आपण) आपल्याला

१०. (ती *pl.*) त्यांना

B. Answer the questions as suggested.

१. तुम्हाला काय पाहिजे ?
(कॉफी)
कॉफी पाहिजे.

२. तुम्हाला काय पाहिजे ?
(चहा)
चहा पाहिजे.

३. तुम्हाला काय पाहिजे ?
(साखर)
साखर पाहिजे.

४. तुम्हाला काय हवं ?
(दूध)
दूध हवं.

५. तुम्हाला काय हवं ?
(पाणी)
पाणी हवं.

६. तुम्हाला काय पाहिजे ?
(आंबे)
आंबे पाहिजेत.

७. तुम्हाला काय पाहिजे ?
(केळी)
केळी पाहिजेत.

८. तुम्हाला काय पाहिजे ?
(संत्री)
संत्री पाहिजेत.

९. तुम्हाला काय पाहिजे ?
(मोसंबी)
मोसंबी पाहिजेत.

१०. तुम्हाला काय पाहिजे ?
(बिस्किटं)
बिस्किटं पाहिजेत.

C. Using the words suggested, ask questions of the pattern **तुम्हाला ________ हवं आहे का**.

१. (आमटी)
तुम्हाला आमटी हवी आहे का ?

२. (भात)
तुम्हाला भात हवा आहे का ?

३. (दही)
तुम्हाला दही हवं आहे का ?

४. (भाकरी)
तुम्हाला भाकरी हवी आहे का ?

५. (पोळी)
तुम्हाला पोळी हवी आहे का ?

६. (चहा)
तुम्हाला चहा हवा आहे का ?

७. (कॉफी)
तुम्हाला कॉफी हवी आहे का ?

८. (चिवडा)
तुम्हाला चिवडा हवा आहे का ?

९. (लाडू)
तुम्हाला लाडू हवा आहे का ?

१०. (पाणी)
तुम्हाला पाणी हवं आहे का ?

D. Using the words suggested, ask questions of the pattern **तुम्हाला कोणतं** ________ **पाहिजे.** Have a second student answer **हे पाहिजे**.

१. (कुडता)
तुम्हाला कोणता कुडता पाहिजे ?
हा पाहिजे.

२. (साडी)
तुम्हाला कोणती साडी पाहिजे ?
ही पाहिजे.

३. (पेन)
तुम्हाला कोणतं पेन पाहिजे ?
हे पाहिजे.

४. (पुस्तक)
तुम्हाला कोणतं पुस्तक पाहिजे ?
हे पाहिजे.

५. (चपला)
तुम्हाला कोणत्या चपला पाहिजेत ?
ह्या पाहिजेत.

६. (सायकल)
तुम्हाला कोणती सायकल पाहिजे ?
ही पाहिजे.

E. Answer the following questions as suggested.

१. किती केळी पाहिजेत ?
(a half dozen)
अर्धा डझन.

२. किती आंबे पाहिजेत ?
(one and a half dozen)
दीड डझन.

३. किती मीटर कापड पाहिजे ?
(one and three quarters)
पावणे दोन.

४. किती दूध पाहिजे ?
(two and a half liters)
अडीच लिटर.

५. किती भाजी पाहिजे ?
(one and a quarter kilos)
सव्वा किलो.

६. किती पाणी पाहिजे ?
(three quarters of a cup)
पाऊण कप.

F. Translate the following questions and answers into Marathi.

1. Do you want a red sari ?
   No, I want a yellow one.
2. Do you want a black cap ?
   No, I want a white one.
3. How many mangoes do you want ?
   I want a dozen.
4. Do you want this cloth ?
   No, it's very expensive.
5. What does she want ?
   She wants a kurta.
6. What color kurta does she want ?
   She wants a green one.
7. How many oranges do they want ?
   They want a half a dozen.
8. How many eggs do they want ?
   They want a dozen and a half.
9. How much milk does he want ?
   He wants two and a half liters.
10. How much cloth do you want ?
    I want three quarters of a meter.
11. Which pen do you want ?
    I want this one.
12. What would you like ?
    Give me a little rice.
13. What would you like ?
    Nothing at all.
14. Would you like a *chapati* ?
    No, I've had enough.
15. Do you want a kilo of sugar ?
    No, a half kilo.
16. What would you like ?
    Some *chivda* and cookies.
17. Would you like some bananas too ?
    No (thank you).*
18. What would the children like ?
    They too want *chivda* and biscuits.

---

* Note that it is not necessary to express ' thank you. '

Chapter Eleven

The Negative Imperative

Request for instruction

SENTENCES

A.	१. इंग्रजीत बोलू नकोस. मराठीत बोल. इंग्रजीत बोलू नका. मराठीत बोला.	Don't speak in English. Speak in Marathi.
	२. तसं करू नकोस. तसं करू नका.	Don't do (like) that.
	३. अभ्यास करू नकोस. सिनेमाला चल. अभ्यास करू नका. सिनेमाला चला.	Don't study. Come on to the movie.
	४. आत्ता बघू नकोस. थोडा वेळ थांब. आत्ता बघू नका. थोडा वेळ थांबा.	Don't look now. Wait a little while.
	५. पेपर घेऊ नकोस. दादांना पाहिजे. पेपर घेऊ नका. दादांना पाहिजे.	Don't take the paper. Dada wants it.

SENTENCES

६.	तू पुढे जा. माझी वाट पाहू नकोस. तुम्ही पुढे जा. माझी वाट पाहू नका.	You go ahead. Don't wait for me.
७.	उशिरा येऊ नकोस. उशिरा येऊ नका.	Don't come late.
८.	तसं कधी करू नकोस. तसं कधी करू नका.	Don't ever do that.
B. ९.	मी येऊ का ? (हो,) ये. (हो,) ये की. (हो,) ये नं / ना. (हो,) या. (हो,) या की. (हो,) या नं / ना.	May I come (in) ? Come on in.
१०.	मी तुझं पेन घेऊ का ? हो, घे. हो, घ्या.	May I take your pen ? Go ahead.
११.	मी इथे थांबू का ? थांब. थांबा.	Shall I wait here ? Yes, do.

SENTENCES

१२.	मी रमेशला भेटू का ?	Shall I meet Ramesh ?
	हो, भेट.	Yes, do.
	हो, भेटा.	
१३.	मी प्रश्न विचारू का ?	May I ask a question ?
	विचार.	Go ahead.
	विचारा.	
१४.	मी उत्तर देऊ का ?	Shall I give the answer ?
	दे.	Yes, do.
	द्या.	
१५.	मी त्यांना पत्र पाठवू का ?	Shall I send them/him/her a letter ?
	पाठव.	
	पाठवा.	Yes, do.
१६.	मी हे पार्सल पोस्टात टाकू का ?	Shall I mail this parcel ?
	हो, टाक.	Yes, do.
	हो, टाका.	
१७.	मी तुला फोन करू का ?	Shall I phone you ?
	कर.	Yes, do.
	करा.	
१८.	मी हे पुस्तक घेऊन जाऊ का ?	May I take this book ?
	घेऊन जा.	Go ahead.

SENTENCES

१९.	मी टपाल घेऊन येऊ का ?	Shall I bring the mail ?
	घेऊन ये.	Yes, do.
	घेऊन या.	
२०.	केळी आणू का ?	Shall I bring some bananas ?
	आण.	Yes, do.
	आणा.	
२१.	मीही करू का ?	Shall I do it too ?
	कर.	Yes do.
	करा.	
२२.	मोसंबी सुद्धा आणू का ?	Shall I bring some oranges too ?
	आण.	Yes, do.
	आणा.	
C. २३.	आम्ही तुमच्याकडे येऊ का ?	Shall we come to your place ?
	हो, या.	Yes, do.
२४.	आम्ही त्यांच्याकडे जाऊ का ?	Shall we go to their/his/her place ?
	जा.	Yes, do.
२५.	आम्ही त्यांना भेटू का ?	Shall we meet them/him/her ?
	भेटा.	Yes, do.

SENTENCES

D. २६.	मी तुझी वाट पाहू का ?	Shall I wait for you ?
	नको, तू पुढे जा.	No, you go ahead.
२७.	मी आत्ता येऊ का ?	Shall I come right now ?
	नको, नंतर या.	No, come later on.
२८.	मी तिच्याकडे जाऊ का ?	Shall I go to her place ?
	नको, माझ्याकडे या.	No, come to my place.
२९.	आम्ही त्यांना फोन करू का ?	Shall we phone them/him/her ?
	नको, पत्र लिहा.	No, write a letter.
३०.	मी अंडी आणू का ?	Shall I bring some eggs ?
	नको, माझ्याकडे आहेत.	No, I have some.
३१.	मी सामान घेऊन येऊ का ?	Shall I bring the things ?
	आत्ता नको, नंतर आण.	Not now, bring them later.

GRAMMAR

Negative imperative

The familiar negative imperative is formed by adding **ऊ नकोस** to the verbal base.

जाऊ नकोस	don't go
बोलू नकोस	don't speak

The respectful negative imperative is formed by adding **ऊ नका** to the verbal base.

जाऊ नका
बोलू नका

Two morphophonemic rules apply to the formation of *V*–**ऊ**. These are Rules M_3 and M_7

	Base	*V*–ऊ
Rule M_3	धु-	धुवू
Rule M_7	उघड-	उघडू
	दाखव-	दाखवू

Bases with **ह** use the alternant without the final vowel.

Base	*V*–ऊ
लिह-/लिही-	लिहू
पाह-/पाहा-	पाहू

See section A for examples of the use of the negative imperative.

Request for instruction

The first person has a question form which is the counterpart of the second person imperative.

मी येऊ का?	May/shall I come ?
हो, या.	Yes, come.

This first person form is a request for permission or instruction. Note that English distinguishes between the request for permission ('may') and for instruction ('shall') while Marathi uses the same construction for both. We shall term this pattern 'the request for instruction.' This construction can be used in either the first person singular or plural. (In the plural it is used only with the exclusive 'we' **आम्ही**.) The formula for this construction is: **मी / आम्ही** *V* - **ऊ का** ? 'May/shall I/we *V* ?' Sometimes in conversation **मी** may be dropped.

केळी आणू का ?	Shall I bring some bananas ?

See sections B and C for examples of the request for instruction.

Affirmative and negative answers. In giving an affirmative answer to a request for instruction, it is not necessary to use **हो**. One may answer simply with the imperative.

मी केळी आणू का ?
आण.

To add emphasis, a speaker may use the emphatic particles **की**, **नं** or **ना**. (See the answers to question 9). These words convey the same type of positive response as English 'certainly,' 'of course,' or 'by all means.'

In giving a negative answer to the request for instruction, a speaker will rarely use the bald negative statement. Rather, he will use the introductory negative **नको** and add some alternative or explanation.

मी तुम्ही वाट पाहू का ?	Shall I wait for you ?
नको, तू पुढे जा.	No, you go ahead.
मी अंडी आणू का ?	Shall I bring some eggs ?
नको, माझ्याकडे आहेत.	No, I have some.

Whether the sentence is in the familiar or respectful, the form **नको** remains unchanged. See section D for other examples of affirmative and negative answers.

Special detail

1. When a personal noun is used as the object of most verbs, it is made indirect by the addition of ला (*pl.* ना).

मी रमेशाला भेटू का?	Shall I meet Ramesh?
मी त्यांना भेटू का?	Shall I meet them/him/her?

2. Note the verbs in the following sentences.

मी हे पुस्तक घेऊन जाऊ का?	May I take this book?
मी टपाल घेऊन येऊ का?	Shall I bring the mail?

Literally घेऊन जा- means 'to take and go' while घेऊन ये- means 'to take and come.' The conjunction ऊन, which is used regularly to join two verbs, will be discussed in detail later.* In the case of घेऊन जा- and घेऊन ये-, though the basic sense of 'to take and go' and 'to take and come' has not been entirely lost, each phrase has more or less the force of a single verb. That is, घेऊन जा- is roughly 'to take while घेऊन ये- is 'to bring.'

3. The sentence माझ्याकडे (अंडी) आहेत 'I have some eggs' illustrates still another means of expressing 'to have.'

Vocabulary note

The word सामान is a general term that can refer to a variety of objects. We have glossed it as '1. a collection of things. 2. materials, stuff. 3. luggage.' In a given context it is, of course, clear which sense is meant.

---

* See Chapter eighteen.

VOCABULARY

अभ्यास *m.* study. ० कर– to study
आत्ता emphatic form of आता
उत्तर, उत्तरं *n.* answer
उशिरा *adv.* late
कधी *adv.* ever, (with neg.) never
घेऊन जा– to take
घेऊन ये– to bring
टपाल *n.* mail
टाक– *v.t.* to throw, drop
तसं *adv.* in that way, like that
थांब– *v.i.* to stop, wait
नं emphatic particle
नंतर *adv.* later
ना emphatic particle
पाठव– *v.t.* to send
पार्सल, पार्सलं *n.* parcel
पेपर, पेपर *m.* newspaper
पोस्ट *n.* post, mail
पोस्टात टाक– to mail
प्रश्न, प्रश्न* *m.* question
फोन, फोन *m.* telephone. ० कर– to telephone
भेट– *v.t.* (*sp.*) to meet
वाच– *v.t* to read
वाट, वाटा *f.*(*e*) way, path. झची ० पाह–/पाहा–** to wait for X
वाढ– *v.t.* to serve
विचार– *v.t.* to ask
वेळ *m.* time (duration)
सामान *n.* 1. collection of things. 2. materials, stuff. 3. luggage.

Phrases

इंग्रजीत in English
प्रोफेसर देशपांड्यांना Professor Deshpande (as obj.)

---

* This is usually pronounced with the retroflex ण and is sometimes written प्रश्ण.

** In formulas we shall use झ as the equivalent of χ.

PRACTICE

A. The commands below are in all the familiar imperative. Put each into the negative.

१. (कर.) करू नकोस.
२. (जा.) जाऊ नकोस.
३. (घे.) घेऊ नकोस.
४. (दे.) देऊ नकोस.
५. (बोल.) बोलू नकोस.
६. (थांब.) थांबू नकोस.
७. (उघड.) उघडू नकोस.
८. (लाव.) लावू नकोस.
९. (बघ.) बघू नकोस.
१०. (ठेव.) ठेवू नकोस.

B. The commands below are all in the respectful imperative. Put each into the negative.

१. (उशिरा या.)
उशिरा येऊ नका.
२. (माझी वाट पाहा.)
माझी वाट पाहू नका.
३. (ती सायकल घ्या.)
ती सायकल घेऊ नका.
४. (तसं करा.)
तसं करू नका.
५. (पैसे द्या.)
पैसे देऊ नका.
६. (पत्र पाठवा.)
पत्र पाठवू नका.
७. (अभ्यास करा.)
अभ्यास करू नका.
८. (उत्तर द्या.)
उत्तर देऊ नका.
९. (इथे थांबा.)
इथे थांबू नका.
१०. (पेपर घेऊन जा.)
पेपर घेऊन जाऊ नका.

C. Using the verbs or verb phrases below, construct questions of the pattern **मी** *V*–**ऊ का.** Go through the exercise a second time, using **आम्ही.**

१. (ये–)
मी येऊ का ?
२. (बस–)
मी बसू का ?
३. (पेन घे–)
मी पेन घेऊ का ?
४. (अंजूला पत्र लिह–)
मी अंजूला पत्र लिहू का ?

५. (सामान आण-)
मी सामान आणू का ?
६. (कपडे धु-)
मी कपडे धुवू का ?
७. (पेपर बघ-)
मी पेपर बघू का ?

८. (प्रोफेसर देशपांडयांना भेट-)
मी प्रोफेसर देशपांड्यांना भेटू का ?
९. (इथे थांब-)
मी इथे थांबू का ?
१०. (पुढे जा-)
मी पुढे जाऊ का ?

D. Answer the following questions in the affirmative, using the familiar imperative. Vary your answers by sometimes using and sometimes omitting **हो**, **की**, etc. Go through the exercise a second time, answering in the respectful.

१. मी रेडिओ लावू का ?
लाव.
लावा.
२. मी पंखा बंद करू का ?
हो, कर.
हो, करा.
३. मी चहा आणू का ?
आण.
आणा.
४. मी टपाल घेऊन येऊ का ?
घेऊन ये.
घेऊन या.
५. मी सामान घेऊन जाऊ का ?
घेऊन जा.

६. मी प्रश्न विचारू का ?
विचार.
विचारा.
७. मी इंग्रजीत बोलू का ?
बोल.
बोला.
८. मी त्याला पैसे देऊ का ?
दे.
द्या.
९. मी फोटो दाखवू का ?
दाखव.
दाखवा.
१०. मी ही साडी घेऊ का ?
घे.
घ्या.

E. Answer the following questions as suggested. Use the respectful form of the imperative.

१. मी पुस्तक घेऊन जाऊ का ?
(No, read it here.)
नको, इथे वाचा.

२. चहा आत्ता आणू का ?
(No, bring it later.)
नको, नंतर आणा.

३. दिवा लावू का ?
(Yes, do.)
हो, लावा.

४. मी इंग्रजीत बोलू का ?
(No, speak in Marathi.)
नको, मराठीत बोला.

५. त्याला पैसे देऊ का ?
(No, give him a shirt.)
नको, शर्ट द्या.*

६. त्याची वाट पाहू का ?
(No, you go ahead.)
नको, पुढे जा.

७. ही लाल साडी घेऊ का ?
(No, take that yellow one.)
नको, ती पिवळी घ्या.

८. पोळी वाढू का ?
(No thanks, I've had enough.)
नको, पुरे.

९. काय देऊ तुम्हाला ?
(Give me a little rice.)
थोडासा भात द्या.

१०. मी आत जाऊ का ?
(No, stay here.)
नको, इथे थांबा.

---

* Note that त्याला is not repeated.

F. Translate the following sentences into Marathi.

1. Shall I serve you some rice ?
2. May I take your bicycle ?
3. Don't come late.
4. How many shall I give (you) ?
5. Don't give (me) too much.
6. Shall I bring some apples ?
7. Don't study now. Come on to a movie.
8. Don't write him a letter. Phone him.
9. May I ask a question ?
10. Shall I show you our garden ?
11. Shall I go too ?
12 Shall I bring some milk too ?
13. Don't ever go there.
14. Don't wait outside. Come in.
15. Don't speak in English. Speak in Marathi.

Chapter Twelve

Request for Instruction (Cont.)

Pronominal interrogatives. Other nouns and pronouns as objects. Adjectival interrogatives. Interrogatives of quantity. Adverbial interrogatives of place

SENTENCES

A.	१.	मी काय करू ?	What shall I do ?
		कप-बशा कपाटात ठेवा.	Put the cups and saucers in the cupboard.
	२.	काय करू ?	What shall I do ?
		ही भांडी घासा.	Wash these dishes.
	३.	काय करू ?	What shall I do ?
		टेबल पुसून घे.	Wipe the table.
	४.	काय करू ?	What shall I do ?
		कपड्यांना इस्त्री करा.	Iron the clothes.
	५.	तुम्हाला काय वाढू ?	What shall I serve you ?
		भात वाढा.	Serve some rice.
	६.	काय देऊ तुम्हाला ?	What shall I give you ?
		कॉफी द्या.	Give (me) some coffee.
	७.	चहासाठी काय करू ?	What shall I make for tea ?
		बिस्किटं करा.	Make some cookies.
	८.	तुम्हाला काय दाखवू ?	What shall I show you ?
		सुती साड्या दाखवा.	Show some cotton saris.
	९.	मी काय पाठ करू ?	What shall I memorize ?
		हे शब्द पाठ कर.	Memorize these words.

SENTENCES

१०.	मी काय शिकू — योग की नाच?	What shall I study—yoga or dance?
	मी काय सांगू? तूच ठरव.	What can I say? *You* decide.
११.	तुम्हाला काय शिकवू?	What shall I teach you?
	एक मराठी गाणं शिकवा.	Teach a Marathi song.
१२.	मी काय करू?	What shall I do?
	आत्ता ठरवू नका. दोन-चार दिवस विचार करा.	Don't decide right now. Think about it for a few days.
B. १३.	मी कोणाला बोलवू?	Who shall I invite?
	झिया आणि नझीरला बोलाव.	Invite Zia and Nazir.
१४.	हे पैसे कोणाला देऊ?	Who shall I give this money to?
	बाईंना दे.	Give it to Bai.
१५.	निरोप कोणाला सांगू?	Who shall I give ('tell') the message to?
	बाबांना सांग.	Give it to Father.
१६.	कोणाला कळवू?	Who shall I inform?
	माधवला कळव.	Inform Madhav.

SENTENCES

---

	१७. ह्याबद्दल कोणाशी बोलू ?	Who shall I talk to about this ?
	मोहनशी बोल.	Talk to Mohan.
C.	१८. कोणते ग्लास वापरू ?	Which glasses shall I use?
	हे वापर.	Use these.
	१९. कसली केळी आणू ?	What kind of bananas shall I bring ?
	पिकलेली आण.	Bring ripe ones.
	२०. कोणतं कापड घेऊ ?	Which cloth shall I take ?
	हे घे.	Take this.
	२१. कोणाची सायकल नेऊ ?	Whose bicycle shall I take ?
	माझी ने.	Take mine.
	२२. कोणतं पेन देऊ ?	Which pen shall I give ?
	हे द्या.	Give this one.
	२३. मी काय मदत करू ?	What can I do to help (‘ what help can I do ’) ?
	खुर्च्या घेऊन ये.	Bring some chairs.
	२४. कसलं गाणं म्हणू ?	What kind of song shall I sing ?
	मराठी गाणं म्हण.	Sing a Marathi song.

SENTENCES

२५.	कोणती बस घेऊ ?	Which bus shall I take ?
	सहा नंबरची घे.	Take number six.
२६.	कुठल्या गाडीनं येऊ ?	What train shall I come by ?
	डेक्कन क्वीननी / क्वीननं ये.	Come by the Deccan Queen.
D. २७.	किती ताटं मांडू ?	How many plates shall I set ?
	वीस मांड.	Set twenty.
२८.	किती साखर घालू ?	How much sugar shall I add ?
	इतकी घाल.	Add this much.
२९.	किती लोकांना बोलवू ?	How many people shall I invite ?
	चार-पाच लोकांना बोलाव.	Invite four or five.
३०.	गूळ केवढा घालू ?	How much jaggery shall I add ?
	एवढा घाल.	Add this much.
E. ३१.	टेबल किती मोठं पाहिजे ?	How big a table do you want ?
३२.	केवढं मोठं टेबल पाहिजे ?	How big a table do you want ?
[illegible]३.	किती लांब जाऊ ?	How far shall I go ?

SENTENCES

F.	३४.	घर किती छान आहे !	How nice the house is !
	३५.	नदी केवढी मोठी आहे !	How big the river is !
G.	३६.	कुठे येऊ ?	Where shall I come ?
		स्टँडवर ये.	Come to the bus stand.
	३७.	कोणाकडे जाऊ ?	Who shall I go to ?
		माधवकडे जा.	Go to Madhav.
	३८.	कुठपर्यंत जाऊ ?	How far ('up to where') shall I go ?
		चौकापर्यंत जा.	Go up to the intersection.
	३९.	पैसे कोणाजवळ / कोणापाशी ठेवू ?	Who shall I keep the money with ?
		आईजवळ / आईपाशी ठेव.	Leave it with Mother.
	४०.	कुठपासून वाचू ?	From where shall I read ?
		तेराव्या पानापासून.	From page 13.

GRAMMAR

This chapter introduces the use of interrogative word questions in the request for instruction sentence pattern. We will deal with pronominal interrogatives, adjectival interrogatives, interrogatives of quantity, and adverbial interrogatives of place.

Pronominal interrogatives

The pronominal interrogatives are **काय, कोणाला** and **कोणाशी. काय** is a direct object while **कोणाला** and **कोणाशी** are indirect objects.

The direct object **काय** immediately precedes the verb.

मी काय करू ?	What shall I do !

If **काय** has an indirect object, the indirect object comes first.

त्याला काय देऊ ?	What shall I give him?

The indirect objects **कोणाला** and **कोणाशी** may either follow or precede a direct object.

पैसे कोणाला देऊ ? कोणाला पैसे देऊ ?	Who shall I give the money to !
मराठी कोणाशी बोलू ? कोणाशी मराठी बोलू ?	Who shall I speak Marathi to !

See sections A and B for examples of the use of pronominal interrogatives.

Other nouns and pronouns as objects

With most verbs a personal noun cannot be treated as a direct object. The noun is made an indirect object by the addition of **ला** or **ना.**

निरोप कोणाला सांगू ?	Who shall I tell the message to ?
आईला सांग.	Tell Mother.

The same holds for pronouns.

तिला सांग.	Tell her.

With a few verbs inanimate objects are also treated as indirect objects rather than direct.

कपड्यांना इस्त्री करा.	Iron the clothes.

Direct and indirect objects are omitted when they are understood from the context.

काय देऊ तुम्हाला ?	What shall I give you ?
कॉफी द्या.	Give (me) coffee.
हे पैसे कोणाला देऊ ?	Who shall I give this money to ?
बाईंना दे.	Give (it) to Bai.

See section B for more examples of the treatment of nouns and pronouns as objects.

Adjectival Interrogatives

The most common adjectival interrogatives are **कोणतं**, **कसलं**, **कोणाचं**, **कुठलं**, and **काय**. They generally precede the noun they modify. All except **काय** are variable.

कोणता ग्लास	which glass
कोणते ग्लास	which glasses
कोणतं कापड	which cloth
कसली केळी	what kind of bananas
कोणाची सायकल	whose bicycle
कुठली गाडी	which train
काय मदत	what help

See section C for examples of adjectival interrogatives.

Interrogatives of quantity

There are two interrogatives of quantity — किती and केवढं. They serve both as adjectives and as adverbs of extent. किती means 'how many, how much' and केवढं 'how much, how big.' As adjectives they may either precede or follow the noun they modify.

किती ताटं मांडू ? ताटं किती मांडू ?	How many plates shall I set ?
केवढा गूळ घालू ? गूळ केवढा घालू ?	How much jaggery shall I add ?

Note that किती is invariable while केवढं is variable.

In quantifying an indirect object किती must precede the noun.

किती लोकांना बोलावू ?	How many people shall I invite ?

See section D for examples of interrogatives of quantity serving as adjectives.

The use of किती and केवढं as adverbs of extent is illustrated in section E. Note again the flexibility permitted in word order. Note too that केवढं agrees with the same word that the adjective does.

In addition to being used as interrogatives, किती and केवढं are also used in exclamations, much like English 'how.' See section F for examples.

Adverbial interrogatives of place

In addition to कुठे which has already been introduced, there are several other interrogative adverbs of place. Some of these are listed below.

कोणाकडं	at whose place, to/with whom
कोणाजवळ	near/with whom
कोणापाशी	near/with whom
कुठपर्यंत	how far, up to where
कुठपासून	from where

Like other adverbs of place, these interrogative adverbs precede the verb.

कोणाकडं जाऊ ?	Who shall I go to ?

See section G for examples.

Special detail

1. The possessive postposition चं is often used as an adjective-maker, as in the phrase सहा नंबरची बस ' bus number six. '

2. नं/नी ' by, with ' is the instrumental postposition. For a detailed discussion of its use see *MRG*, pp. 110-11.

3. Note that in कप-बशा ' cups and saucers ' the two words are treated as a compound rather than being joined with आणि. This is commonly done with closely-related words.

टेबल-खुर्च्या	tables and chairs
मित्र-मैत्रिणी	male friends and female friends
भाऊ-बहिणी	brothers and sisters

Vocabulary notes

1. कुठलं literally means ' of which place. ' It is often used in this sense, as in the question तुम्ही कुठले ' where are you from ' (' of what place are you '). Often, however, it simply means ' which. '

2. With the verb बोल- one generally uses the postposition शी rather than ला.

आईशी बोल.	Speak to Mother.

Used with the postposition ला, बोल- means ' to reprimand. '

3. The verbs **ठेव**- and **मांड**- both can be translated as ' to put, ' but there is a difference between them. **ठेव**- means ' to put down ' or ' to put away, ' while **मांड**- means to ' set out ' or ' lay out. '

4. **पुसून घे**- is a compound that means more or less the same thing as the simple verb **पुस**- ' to wipe. '

VOCABULARY

इंग्रजी *adj. inv.* English
इतकं *adj.* so much, this much
इस्त्री, इस्त्र्या *f.* iron. o **कर**– to iron
एवढं *adj.* this much, this big
कसलं *interrog. adj.* what kind of
कळव– *v.t.* to inform
काढ– *v.t.* to get, procure (as a ticket)
किती *interrog. adj.. interrog. adv.* how many, how much *interj.* how
कुठपर्यंत *interrog. adv.* up to where, how far
कुठपासून *interrog. adv.* from where
कुठलं *interrog. adj.* which, of what place, from where
केवढं *interrog. adj . interrog. adv.* how much, how big. *interj.* how
कोणाजवळ *interrog. adv.* near/with whom
कोणापाशी *interrog. adv.* near/with whom
कोणाला *interrog. pron.* whom, who (as obj.) to whom
कोणाशी *interrog. pron.* to whom
गाडी, गाड्या *f.* train, bus
गाणं, गाणी *n.* song
गूळ *m.* coarse brown sugar, jaggery
ग्लास, ग्लास *m.* glass
घाल– *v.t.* (*irreg.*) to put in, add
घास– *v.t.* to scour, wash
चमचा, चमचे *m.* spoon, spoonful
चौक, चौक *m.* intersection
टेप, टेप्स *f.* tape recording
ठरव– *v.t.* to decide
डेक्कन क्वीन *f.* Deccan Queen (a train running between Pune and Bombay)
ताट, ताटं *n.* metal dinner plate
तिकीट, तिकिटं *n.* ticket
तेरावं *adj.* thirteenth
दिवस, दिवस *m.* day
नं / नी *post.* by
नंबर, नंबर *m.* number
नाच, नाच *m.* dance
निरोप, निरोप *m.* message
पर्यंत *post.* up to, as far as
पाठ *adj. inv.* memorized. o **कर**– to memorize
पान, पानं *n.* page
पासून *post.* from

VOCABULARY

पिकलेलं *adj.* ripe
पुस– *v.t.* to wipe
बद्दल *post.* about
बस, बसेस/बशी *f.*, *f.*(*i*) bus
बोलव– / बोलाव– *v.t.* to call, invite
मदत *f.*(*i*) help. ० कर– to help
मराठी *adj. inv.* Marathi
मांड- *v.t.* to set, set out, lay out
म्हण- *v.t.*(*irreg.*) to sing
योग *m.* yoga
वापर– *v t.* to use
विचार, विचार *m.* thought. ० कर– to think
शब्द, शब्द *m.* word
शिक– *v.t* (*sp.*) to learn
शिकव– *v.t.* to teach
शी *post.* to, with
सांग– *v.t.* (*irreg.*) to tell
साठी *post.* for
सुती *adj. inv.* cotton
स्टँड, स्टँड *m.* bus stand

Phrases

कप–बशा cups and saucers
कपड्यांना the clothes (as obj. of इस्त्री कर–)
चहासाठी for tea
बाईंना to Bai
बाईंशी to Bai
बाबांना to Father
ह्याबद्दल about this
सहा नंबरची बस bus number six
कुठल्या गाडीनं by which train
डेक्कन क्वीननी / क्वीननं by the Deccan Queen
लोकांना to the people, people (as obj.)
स्टँडवर to the bus stand
चौकापर्यंत up to the intersection
त्या देवळापर्यंत up to that temple
आईजवळ/आईपाशी near/with Mother
तेरावं पान the thirteenth page
तेराव्या पानापासून from the thirteenth page

PRACTICE

A. Use the verbs below in the pattern मी काय *V*– ऊ ?

१. (कर–)
मी काय करू ?
२. (दे–)
मी काय देऊ ?
३. (पाठव–)
मी काय पाठवू ?
४. (वाच–)
मी काय वाचू ?

५. (लिह-)
मी काय लिहू ?
६. (दाखव-)
मी काय दाखवू ?
७. (आण-)
मी काय आणू ?
८. (शिक-)
मी काय शिकू ?
९. (शिकव-)
मी काय शिकवू ?
१०. (घे-)
मी काय घेऊ ?
११. (वापर-)
मी काय वापरू ?
१२. (घाल-)
मी काय घालू ?
१३. (सांग-)
मी काय सांगू ?
१४. (म्हण-)
मी काय म्हणू ?
१५. (ठरव-)
मी काय ठरवू ?
१६. (खा-)
मी काय खाऊ ?

B. Use the verbs or verb phrases below in the pattern **कोणाला** *V*–**ऊ**.

१. (बोलाव-)
कोणाला बोलावू ?
२. (निरोप सांग-)
निरोप कोणाला सांगू ?
३. (ही पुस्तकं पाठव-)
ही पुस्तकं कोणाला पाठवू ?
४. (पैसे दे-)
पैसे कोणाला देऊ ?
५. (घेऊन ये-)
कोणाला घेऊन येऊ ?
६. (मदत कर-)
कोणाला मदत करू ?
७. (तुझ्याकडे पाठव-)
तुझ्याकडे कोणाला पाठवू ?
८. (विचार-)
कोणाला विचारू ?
९. (भेट-)
कोणाला भेटू ?
१०. (पत्र लिह-)
पत्र कोणाला लिहू ?

C. Complete the sentences below by filling in the blank with the Marathi equivalent of the English word indicated.

१. (which) ________ कुठता घेऊ ? कोणता

२. (how much) ________ दूध आणू ? किती

३. (what kind of) ________ साडी देऊ ? कसली

४. (what) ________ मदत करू ? काय

५. (which) ________ पुस्तक पाठवू ? कोणतं

६. (how many) ________ लोकांना बोलावू ? किती

७. (who) ________ सांगू ? कोणाला

८. (what) ________ करू ? काय

९. (how many) ________ ताटं मांडू ? किती

१०. (how many) ________ तिकिटं काढू ? किती

११. (how much) ________ साखर घालू ? किती / केवढी

१२. (up to where) ________ जाऊ ? कुठपर्यंत

१३. (from where) ________ वाचू ? कुठपासून

१४. (at whose place) ________ थांबू ? कोणाकडे

१५. (how) ________ लांब जाऊ ? किती

१६. (with whom) ________ कागद ठेवू ? कोणाजवळ / कोणापाशी

D. Answer the following questions as suggested.

१. मी काय करू ?
(Wash these clothes.)
हे कपडे धू.

२. मी काय करू ?
(Wipe the table.)
टेबल पूस.

३. चहासाठी काय करू ?
(Make some *ladus.*)
लाडू कर.

४. काय करू ?
(Iron the clothes.)
कपड्यांना इस्त्री कर.

५. काय आणू ?
(Bring some ripe bananas.)
पिकलेली केळी आण.

६. त्याला काय पाठवू ?
(Send him a shirt.)
शर्ट पाठव.

७. कसलं गाणं म्हणू ?
(Sing an English song.)
इंग्रजी गाणं म्हण.

८. काय पाठ करू ?
(Memorize these words.)
हे शब्द पाठ कर.

९. काय करू ?
(Listen to this tape.)
ही टेप ऐक.

१०. कोणाला फोन करू ?
(Call me.)
मला कर.

११. कोणतं कापड घेऊ ?
(Take this.)
हे घे.

१२. किती अंडी आणू ?
(Bring a dozen.)
एक डझन आण.

१३. कुठली बस घेऊ ?
(Take number three.)
तीन नंबरची घे.

१४. कुठल्या गाडीनं येऊ ?
(Come on the Deccan Queen.)
डेक्कन क्वीननं ये.

१५. कुठपर्यंत जाऊ?
(Up to that temple.)
त्या देवळापर्यंत जा.

१६. कुठे येऊ?
(Home.)
घरी ये.

१७. किती दूध घालू?
(One and a half cups.)
दीड कप.

१८. कोणाशी बोलू?
(To Bai.)
बाईशी बोल.

१९. कोणाकडे नाच शिकू?
(With Madhav.)
माधवकडे.

२०. केवढी साखर घालू?
(Two and a half cups.)
अडीच कप घाल.

E. Translate the following sentences into Marathi.

1. What shall I give you?
2. How many days shall I wait?
3. Which lamp shall I take?*
4. How many cups and saucers shall I bring?
5. Who shall I inform?
6. What shall I send?
7. What kind of book shall I give?
8. Which bus shall I take?
9. Whose bicycle shall I take?
10. How much money shall I give?
11. Help Arun.

---

* Note in this exercise that 'take' is translated by various Marathi words, according to the context. In sentences 3 and 8 घे- should be used, while in sentence 9 ने- should be used.

12. Put in half a spoonful of sugar.
13. Use my bicycle.
14. Don't decide now. Think about it for one or two days.
15. Call Dada.
16. Learn yoga.
17. Wash the dishes.
18. Where shall I come ?
19. How far should I go ?
20. How much milk should I add ?
21. From where shall I start writing (' from where shall I write ') ?
22. Who shall I leave the books with ?
23. How beautiful the town is !
24. How big the house is !
25. How sweet the baby is !

Chapter Thirteen

Adverbial Expressions of Time

Locative case endings. Calendar

SENTENCES

A.	१.	मी केव्हा येऊ?	When shall I come?
	२.	कधी येऊ?	When shall I come?
	३.	आज ये.	Come today.
	४.	उद्या ये.	Come tomorrow.
	५.	परवा ये.	Come the day after tomorrow.
	६.	सकाळी ये.	Come in the morning.
	७.	दुपारी ये.	Come in the afternoon.
	८.	संध्याकाळी ये.	Come in the evening.
	९.	रात्री ये.	Come at night.
	१०.	आज दुपारी ये.	Come this afternoon.
	११.	पुढच्या आठवड्यात ये.	Come next week.
	१२.	येत्या रविवारी ये.	Come this coming Sunday.
	१३.	पुढच्या महिन्यात ये.	Come next month.
B.	१४.	आज किती तारीख आहे?	What date is it today?
		आज (एप्रिलची) पंधरा तारीख आहे.	Today is the fifteenth (of April).
	१५.	उद्या किती तारीख आहे?	What date is it tomorrow?
		सोळा.	The sixteenth.

SENTENCES

१६. परवा किती तारीख आहे ?	What date is it the day after tomorrow ?
सतरा.	The seventeenth.
१७. काल किती तारीख होती ?	What date was it yesterday ?
चौदा.	The fourteenth.
१८. परवा किती तारीख होती ?	What date was it the day before yesterday ?
तेरा.	The thirteenth.
१९. आज कोण वार आहे ?	What day is it today ?
आज गुरुवार (आहे).	Today is Thursday.
२०. उद्या कोण वार आहे ?	What day is it tomorrow ?
उद्या शुक्रवार.	Tomorrow is Friday.
२१. परवा कोण वार आहे ?	What day is it the day after tomorrow ?
शनिवार.	Saturday.
२२. काल कोण वार होता ?	What day was it yesterday ?
काल बुधवार होता.	Yesterday was Wednesday.
२३. परवा कोण वार होता ?	What day was it the day before yesterday ?
मंगळवार.	Tuesday.

SENTENCES

२४.	हा कुठला महिना आहे ?	What month is this ?
	हा एप्रिल.	It's April.
C. २५.	काम केव्हा सुरू करू ?	When shall I start the work ?
	सोमवारी सुरू कर.	Start on Monday.
२६.	केव्हा निघू ?	When shall I leave ?
	रविवारी निघ.	Leave on Sunday.
२७.	त्यांच्याकडे कधी जाऊ ?	When shall I go to their/his/her place ?
	शनिवारी जा.	Go on Saturday.
२८.	किती तारखेला जाऊ ?	On what date shall I go ?
	पाच तारखेला जा.	Go on the fifth.
२९.	लोकांना किती तारखेला बोलवू ?	On what date shall I invite the people ?
	आठ तारखेला बोलव.	Invite them on the eighth.
३०.	पुस्तकं केव्हा पाठवू ?	When shall I send the books ?
	उद्या पाठव.	Send them tomorrow.
D. ३१.	आत्ता सामान आणू का ?	Shall I bring the things right now ?
	इतक्यात नको, नंतर आण.	No, not just yet, bring them later.

SENTENCES

३२.	थोड्या वेळांनी परत येऊ का ? ये.	Shall I come back in a little while? Yes, do.
E. ३३.	मंगळवारी सकाळी निघा.	Leave Tuesday morning.
३४.	त्यांना लगेच फोन करा.	Phone them/him/her right away.
३५.	अजून थोडा वेळ थांब.	Wait a little longer.
३६.	वेळेवर ये.	Come on time.
३७.	त्या वेळी या.	Come at that time.
३८.	ताबडतोब ये.	Come at once.
३९.	हे काम लवकर संपवून टाक.	Finish up this work soon.
४०.	उद्या सकाळी लवकर उठ.	Get up early tomorrow.
४१.	साखर चट्कन घेऊन ये.	Bring some sugar quick.
४२.	अगोदर घरी ये. मग त्यांच्याकडे जा.	First come home. Then go to their/his/her place.
४३.	आधी तुझा अभ्यास संपवून टाक. मग बाहेर जा.	First finish your homework. Then go out.
४४.	ते वाक्य परत म्हणा.	Say that sentence again.
४५.	लवकर परत ये.	Come back soon.
४६.	पुढच्या/पुढल्या वर्षी लवकर या!	Come early next year!

---

* This is what is shouted at the conclusion of the Ganpati festival when the idol is immersed in the river.

GRAMMAR

Adverbial expressions of time

Adverbs and adverbial expressions of time generally precede the verb.

मी केव्हा येऊ ?	When shall I come !
आज ये.	Come today.
पुढच्या आठवड्यात ये.	Come next week.

Objects usually precede an interrogative adverb of time.

पुस्तकं केव्हा पाठवू ?	When shall I send the books ?

In statements and yes–no questions either the object or the adverb may come first.

आजच सामान आणू का ?	Should I bring the things *today* ?
सामान आजच आणू का ?	
आजच सामान आण.	Bring the things *today*.
सामान आजच आण.	

Locative case endings

For many words connected with time the old locative ending ई is still used. This ending has the meaning ‘ in, ’ ‘ at, ’ or ‘ on. ’

सकाळी	in the morning
दुपारी	in the afternoon
संध्याकाळी	in the evening
रात्री	at night
रविवारी	on Sunday
सोमवारी	on Monday
मंगळवारी	on Tuesday
बुधवारी	on Wednesday
गुरुवारी	on Thursday
शुक्रवारी	on Friday

शनिवारी	on Saturday
वर्षी	in . . . year
त्या वेळी	at that time

Phrases. The above locative forms referring to time can be combined with each other or with other words to make phrases. Below are a few examples. Many more combinations, of course, are possible.

आज सकाळी	this morning
उद्या सकाळी	tomorrow morning
परवा सकाळी	the day after tomorrow morning, the day before yesterday morning

आज रात्री	tonight
सोमवारी दुपारी	Monday afternoon
येत्या रविवारी	this coming Sunday

Calendar

In Maharashtra, and throughout India three calendars are followed—the Roman calendar, the Hindu calendar, and the Muslim calendar. Generally, secular events are referred to in terms of the Roman calendar and religious events in terms of the Hindu and Muslim calendars respectively.* Regardless of which calendar is used, the traditional names of the days of the week are used. (Interestingly, each day is named after the same heavenly body as it is in the Roman calendar. This is apparently due to the fact that these names have a common Indo-European origin.) For the months of the Roman calendar Marathi uses English names.

---

* Strictly speaking, as far as counting of years, there are at least two Hindu calendars. Such technicalities need not concern us, however. For more information on the Hindu calendar, see *MRG*, Appendix A. For more information on the Muslim calendar, see the vocabulary manual.

Dates. Note the constructions for talking about dates.

आज किती तारीख आहे ?	What date is it today ?
आज (एप्रिलची) १५ तारीख आहे.	Today is April 15.
किती तारखेला येऊ ?	On what day shall I come ?
पाच तारखेला या.	Come on the fifth.

Note that while English uses ordinal numbers (first, second, third, etc.) for dates Marathi generally uses cardinal numbers. (**एक, दोन, तीन**, etc.). The date is put before the month both in writing and in speech (unlike American English where one often says ' the fifteenth of April ' but writes ' April 15 '). This practice is also followed when the date is written in numerals, e.g., **१५/४/८२.**

Special detail

1. Sentences 17 and 22 contain the verbs **होती** and **होता,** which are past tense forms of the auxiliary. Note that these verbs have the regular adjective endings, which agree with the subject. The full paradigm of the past tense of the auxiliary is given in Chapter twenty.

2. The phrasal verb **संपवून टाक**- used in sentence 39 looks identical in form to **घेऊन जा**- and **घेऊन ये**-, which were introduced in Chapter eleven. There is an important difference between them, however. In **घेऊन जा**- and **घेऊन ये**- both verbs in the construction retain their meaning. Thus, **घेऊन जा**-, as we have observed earlier, means ' take and go. ' In the case of **संपवून टाक**- , however, the meaning of **टाक**- is almost completely attenuated. **टाक**- only serves to give a sense of finality to the action, much as *up* does in English (cf., ' finish up, finish off '). Note these other examples of the use of **टाक**-.

खाऊन टाक.	Eat it up.
पिऊन टाक.	Drink it up.
लिहून टाक.	Write it (once and for all).
देऊन टाक.	Give it away.

Vocabulary notes

1. Though लगेच and तावडतोब both mean ‘immediately.’ तावडतोब is the stronger word.

2. चट्कन is an onomatopoetic word for ‘quickly,’ ‘instantaneously.’ The sound suggests the smartness and dispatch of the action. The other words used interchangeably with चट्कन are चट्दिशी, पट्कन, and पट्दिशी.

3. Note that the meaning of लवकर encompasses ‘early,’ ‘soon,’ and quickly.’

4. There are a number of words meaning ‘first’ (as in ‘do it *first*’).

अगोदर
पहिल्यांदा
आधी
प्रथम

5. Note that परवा means both ‘the day before yesterday’ and ‘the day after tomorrow.’

6. Note that वेळ has two different meanings and genders. वेळ *m.* means ‘time’ in the sense of duration.

थोडा वेळ थांब.	Wait a little while.
थोड्या वेळानं या.	Come after a while.

वेळ, वेळा *f.*(*e*) means ‘time’ in the sense of a fixed point of time or occasion.

ही वेळ चांगली आहे.	This is a good time.
वेळेवर या.	Come on time.
त्या वेळी या.	Come at that time.

VOCABULARY

अगोदर *adv.* first
अजून *adv.* still, yet
अमेरिका *f* (*e*) United States of America
आज *adv.* today
आठवडा, आठवडे *m.* week
आधी *adv.* first
इतक्यात *adv.* just yet (with neg.)
उद्या *adv.* tomorrow
कधी *interrog. adv.* when
काम, कामं *n.* work
काल *adv.* yesterday
केव्हा *interrog. adv.* when
घरी in, to, at one's home
चट्कन *adv.* quickly
चट्दिशी *adv.* quickly
तावडतोब *adv.* immediately
तारीख, तारखा *f.*(*e*) date
दुपार, दुपारी *f.*(*i*) afternoon. **दुपारी** in the afternoon
निघ– *v i.*(*irreg.*) to set out, leave
पट्कन *adv.* quickly
पट्दिशी *adv.* quickly
परत *adv.* 1. back. 2. again
परवा *adv.* 1. day after tomorrow. 2. day before yesterday
पहिल्यांदा *adv.* first of all, at first
पुढचं *adj.* next
पुढलं *adj.* next
पुन्हा *adv.* again
प्रथम *adv.* first
मग *adv.* then
महिना, महिने *m.* month
यंदा *adv.* this year
येतं *adj.* coming, next
रात्र, रात्री *f.*(*i*) night. **रात्री** at night
लगेच *adv.* immediately
लवकर *adv.* early, soon, quickly
वर्ष, वर्षं *n.* year, **वर्षी** in . . . year
वाक्य, वाक्यं *n.* sentence
वार, वार *m.* day of the week
वेळ, वेळा *f.*(*e*) time (fixed point in time, occasion). **त्या वेळी** at that time
सकाळ, सकाळी *f.*(*i*) morning. **सकाळी** in the morning
संध्याकाळ, संध्याकाळी *f.*(*i*) evening. **संध्याकाळी** in the evening
संपव– *v t.* to finish. **संपवून टाक–** to finish up
सुरू *adj. inv.* begun, underway, in progress. o **कर–** to begin
होता, होती past tense of **अस–**

Postpositional phrases

थोड्या वेळानी/थोड्या वेळानं in a little while
वेळेवर on time
येत्या रविवारी this coming Sunday
पुढच्या आठवड्यात next week
पुढच्या महिन्यात next month
पुढच्या वर्षी next year
पुढल्या वर्षी next year

VOCABULARY

अंमरिकेला	to America
किती तारखेला	on what date
आठ तारखेला	on the eighth
एप्रिलची पंधरा तारीख	the fifteenth of April

Days of the week

रविवार, रविवार	*m.* Sunday
सोमवार, सोमवार	*m.* Monday
मंगळवार, मंगळवार	*m.* Tuesday
बुधवार, बुधवार	*m.* Wednesday
गुरुवार, गुरुवार	*m.* Thursday
शुक्रवार, शुक्रवार	*m.* Friday
शनिवार, शनिवार	*m.* Saturday

Roman calendar months

जानेवारी	*m.* January
फेब्रुवारी	*m.* February
मार्च	*m.* March
एप्रिल	*m.* April
मे	*m.* May
जून	*m.* June
जुलै	*m.* July
ऑगस्ट	*m.* August
सप्टेंबर	*m.* September
ऑक्टोबर	*m.* October
नोव्हेंबर	*m.* November
डिसेंबर	*m.* December

---

* Some speakers say **आदितवार** instead of **रविवार**.

PRACTICE

A. Practice the words referring to days and parts of the day using the chart below.

	Yesterday	Today	Tomorrow	Day after tomorrow
Morning				
Afternoon				
Evening				
Night				

First drill only the parts of the day by pointing to the English words. Then drill the days ('yesterday,' 'today,' etc.). Then practice combining them. To do this, point at a square and have a second student give the phrase that uses the two coordinates. For instance, if one points at the upper left square the other should say **काल सकाळी.** Note that in this last exercise the locative forms are required.

B. Draw a similar diagram using the days of the week in place of 'yesterday,' 'today,' etc. Use it in the same fashion.

C Using a calendar point at various months, days, and dates, asking questions such as those in the examples below.

Examples

हा कुठला महिना आहे ?
आज कोण वार आहे ?
आज किती तारीख आहे ?

D. Answer the following questions as suggested. Use the respectful imperative.

१. मी तुमच्याकडे केव्हा येऊ?
(आज)
आज या.

२. तुमच्याकडे कधी येऊ?
(उद्या)
उद्या या.

३. तुमच्याकडे कधी येऊ?
(परवा)
परवा या.

४. तुमच्याकडे केव्हा येऊ?
(आज दुपारी)
आज दुपारी या.

५. त्यांच्याकडे केव्हा जाऊ?
(सोमवारी संध्याकाळी)
सोमवारी संध्याकाळी जा.

६. त्यांच्याकडे केव्हा जाऊ?
(शनिवारी दुपारी)
शनिवारी दुपारी जा.

७. त्यांच्याकडे केव्हा जाऊ?
(बुधवारी सकाळी)
बुधवारी सकाळी जा.

८. त्यांच्याकडे केव्हा जाऊ?
(परवा रात्री)
परवा रात्री जा.

९. त्यांच्याकडे केव्हा जाऊ?
(रविवारी संध्याकाळी)
रविवारी संध्याकाळी जा.

१०. त्यांच्याकडे केव्हा जाऊ?
(उद्या दुपारी)
उद्या दुपारी जा.

E. Answer the following questions as suggested. Use the familiar imperative.

१. प्रोफेसर पवारांना केव्हा भेटू?
(Meet him tomorrow morning.)
उद्या सकाळी भेट.

२. त्यांना केव्हा फोन करू?
(Phone right now.)
आत्ता कर.

३. काम केव्हा सुरू करू?
(Start next week.)
पुढच्या आठवड्यात कर.

४. चहा केव्हा करू?
(Make it in a little while.)
थोड्या वेळानी कर.

५. पुण्याला केव्हा जाऊ?
(Go on Thursday morning.)
गुरुवारी सकाळी जा.

६. कपडे केव्हा धुवू?
(Wash them in the morning.)
सकाळी धू.

७. लोकांना केव्हा बोलवू?
(Invite them Friday evening.)
शुक्रवारी संध्याकाळी बोलव.

८. टपाल केव्हा घेऊन येऊ?
(Bring it right away.)
लगेच घेऊन ये.

९. मी यंदा अमेरिकेला जाऊ का?
(Don't go just yet. Go next year).
इतक्यात जाऊ नकोस. पुढच्या वर्षी जा.

१०. मुंबईला किती तारखेला जाऊ?
(Go on the third.)
तीन तारखेला जा.

F. Fill in the blank with the Marathi equivalent of the word in parentheses.

१. ______ ये.
(on time)
वेळेवर ये.

२. ______ येऊ नकोस.
(late)
उशिरा येऊ नकोस.

३. ______ थांबा.
(a little while)
थोडा वेळ थांबा.

४. ______ हे काम संपव.
(first)
अगोदर हे काम संपव.

५. ______ ये.
(immediately)
लगेच ये.

६. ______ ये.
(soon)
लवकर ये.

७. ______ उठ.
(early)
लवकर उठ.

८. ______ थांबा.
(still a little more time)
अजून थोडा वेळ थांबा.

९. ______ जा.
(after a while)
थोड्या वेळानं जा.

१०. ______ काय करू ?
(first of all)
पहिल्यांदा काय करू ?

११. ______ ते काम सुरू करू नका.
(this year)
यंदा ते काम सुरू करू नका.

१२. तिकडे ______ जा.
(quickly)
तिकडे लवकर जा.

१३. ______ सांगा.
(again)
पुन्हा / परत सांगा.

१४. लवकर ______ ये.
(back)
लवकर परत ये.

१५. त्यांना ______ बोलाव.
(at once)
त्यांना ताबडतोब बोलाव.

१६. ______ करा.
(later)
नंतर करा.

G. Translate the following sentences into Marathi.

1. Today is Monday.
2. Today is the fifteenth of May.
3. Yesterday was Sunday.
4. What month is it ?
5. Phone me on Thursday morning.
6. Finish up your work right away.
7. Write a letter soon.
8. Inform us first.
9. Come on Friday morning.
10. Go to Bombay on the twentieth.
11. Come next week.
12. Start the work next month.
13. Go to America next year.
14. Go next Saturday.
15. Invite them on the tenth.
16. Come home soon.
17. Come back tomorrow morning.
18. Say that word again.
19 Tell me the sentence again.
20. Sing that song again.
21. Go right away.
22. First of all, write to Professor Shah.

PART TWO

Introduction

Part Two is almost entirely devoted to verbal constructions. Marathi verbal constructions can be divided into two classes — participial and unitary constructions. Unitary constructions, for the most part, belong to the archaic part of the language. Only one of them — the future — is used in daily speech. This is the only unitary verb construction dealt with here. The participial constructions, on the other hand, belong to the living core of the language. Their forms can be put together in a large number of permutations and combinations. It would be difficult to present all of them here, but fortunately it is not necessary, for the meaning of a participial construction is usually evident from its constituent parts. What is important is to grasp the basic elements of the system and how they fit together.

In thinking about verbs students tend to use the categories of tense — present, past, and future — which they have learned for English grammar. Actually, these categories do not fit English very well, and they certainly do not fit Marathi.* It is more useful to think of verbal constructions as a combination of elements indicating aspect and tense.

Aspect is a somewhat difficult concept to grasp, but it refers to the way we view an action in relation to the flow of time. An action can be viewed as complete, as in progress, as repeated, or as imminent. For the first of these — action viewed as complete — we use the perfect aspect. For action in progress or repeated action we use the imperfect, and for action viewed as imminent we use the prospective. An aspectual form can be used in conjunction with an auxiliary verb indicating the tense, or with another aspectual form. Thus, with a small number of elements we have a system of great flexibility.**

---

* It should be kept in mind, however, that the terminology here is our own and is not in general use. What we have termed the imperfect and perfect are called the present and past in traditional Marathi grammar.

**For a fuller discussion of tense, aspect, and participial constructions, see *MRG* pp. 54-55 and 87.

Chapter Fourteen

The Imperfect A

Imperfect A form of auxiliary

SENTENCES

A.	१. तुम्ही काय करता ?	What do you do ?
	२. तू काय करतोस / करतेस ?*	What do you do ?
	३. मी युनिव्हर्सिटीत शिकतो / शिकते.	I study in the university.
	४. मी शाळेत शिकवतो / शिकवते.	I teach in a school.
	५. मी सरकारी नोकरी करतो / करते.	I am in government service (' I do government service ').
	६. मी शेती करतो / करते.	I farm (' I do farming ').
	७. मी भाजीचा धंदा करतो / करते.	I'm in the vegetable business (' I do the vegetable business ').
	८. मी शिवणकाम करतो / करते.	I do sewing.
	९. मी मजुरी करतो / करते.	I do manual labor.

---

* Throughout this chapter the alternative forms given are the feminine forms.

SENTENCES

	१०. मी साखर कारखान्यात कामाला असतो / असते.	I work in the sugar factory (' I am at work in the sugar factory ').
B.	११. सध्या तुम्ही कुठे राहाता ?	Where do you live at present ?
	१२. सध्या तू कुठे राहातोस / राहातेस ?	Where do you live at present ?
	१३. कोणाकडे राहाता ?	Who do you stay with ?
	१४. कोणाकडे राहातोस / राहातेस ?	Who do you stay with ?
	१५. मी पुण्याला राहातो / राहाते.	I live in Pune.
	१६. मी मुंबईला राहातो / राहाते.	I live in Bombay.
	१७. मी डेक्कन जिमखान्यावर राहातो / राहाते.	I live in Deccan Gymkhana.
	१८. मी दादरला राहातो / राहाते.	I live in Dadar.
	१९. मी हॉटेलमध्ये राहातो / राहाते.	I stay in a hotel.
	२०. मी डॉ. अशोक गोखल्यांच्याकडे राहातो / राहाते.	I stay with Dr. Ashok Gokhale.
	२१. मी बोर्डिंगमधे राहातो / राहाते.	I stay in a dormitory.
C.	२२. तुम्ही कुठे जेवता ?	Where do you eat your meals ?
	२३. तू कुठे जेवतोस / जेवतेस ?	Where do you eat your meals ?

SENTENCES

२४.	मी घरीच जेवतो / जेवते.	I eat at home.
२५.	मी हॉटेलमधे जेवतो / जेवते.	I eat in a restaurant.
२६.	मी खानावळीत जेवतो / जेवते.	I eat in a boardinghouse.
२७.	मी घरनं डबा नेतो / नेते.	I carry my lunch (from home).
D. २८.	तुम्ही काय करता ?	What do you do ?
	मी कॉलेजला असतो / असते.	I'm in college.
	काय शिकता ?	What do you study ?
	भारतीय इतिहास.	Indian history.
E. २९.	तुम्ही काय करता ?	What do you do ?
	मी युनिव्हर्सिटीत शिकतो / शिकते.	I study in the university.
	कशाचा अभ्यास करता ?	What do you study (' of what do you do the study ')?
	मराठी भाषा आणि संस्कृतीचा.	Marathi language and culture (' of Marathi language and culture ').
३०.	तुम्ही काय करता ?	What do you do ?
	आम्ही टाइपरायटरची विक्री आणि दुरुस्ती करतो.	We sell and repair typewriters (' we do the sale and repairing of typewriters ').

SENTENCES

३१.	तुम्ही जुने टाइपरायटर विकत घेता का ?	Do you buy old typewriters ?
	हो, घेतो.	Yes, we do.
३२.	तुम्ही काय बनवता ?	What do you manufacture ?
	इलेक्ट्रॉनिक पार्ट्स्.	Electronic parts.
३३.	तुम्ही सायकली विकता का ?	Do you sell bicycles ?
	नाही, भाड्यानं देतो.	No, we rent them (' give them on rent ').
३४.	तुम्ही पुण्यात राहाता का ?	Do you live in Pune ?
	नाही, कोल्हापूरला राहातो / राहाते.	No, I live in Kolhapur.
३५.	तुम्ही हॉटेलमधे राहाता का ?	Do you live in a hotel ?
	नाही, मी डॉ. अशोक गोखल्यांच्याकडे राहातो / राहाते.	No, I stay with Dr. Ashok Gokhale.
३६.	तुम्ही प्रोफेसर शहांना ओळखता का ?	Do you know Professor Shah ?
	हो, ओळखतो / ओळखते.	Yes, I do.
E. ३७.	तो डॉक्टर आहे.	He is a doctor.
३८.	तो मुंबईत आहे.	He is in Bombay.
३९.	तो मुंबईत असतो.	He stays in Bombay.
४०.	त्याचं पुस्तक चांगलं आहे.	His book is good.
४१.	त्याची पुस्तकं चांगली असतात.	His books are generally good.

GRAMMAR

Use of imperfect A

It is in one sense inappropriate to begin the presentation of participial constructions with the imperfect A because the imperfect A is not a typical participial construction. It does not, like typical participial constructions, consist of an aspectual participle and an auxiliary. Moreover, it is limited to the affirmative and the present tense. In fact, we have included it in the imperfect only by virtue of the fact that it contains the त which is the marker of the imperfect. In regard to form, then, the imperfect A can be regarded as a specialized fragment related to the imperfect B, which is a typical participial construction. Though formally the imperfect A may be somewhat anomalous, it is a construction of major importance, and it is for this reason that we are taking it up first.

The imperfect A is used primarily to express present habitual actions. It is more or less equivalent to what in English is called the simple present tense. An examination of the example sentences in sections A–E above should give some sense of the use of this construction. Note particularly the following questions.

तुम्ही काय करता ?	What do you do ?
तुम्ही कुठे राहाता ?	Where do you live ?
तुम्ही काय शिकता ?	What do you study ?
तुम्ही कुठे जेवता ?	Where do you eat ?

All these question have to do with habitual actions or the conditions and activities that make up the pattern of life of the person addressed.

The imperfect A is also used to announce an action that one is about to perform. For instance, after looking at a number of items in a shop, a customer says, " I'll take this one. " While English uses the future in this situation, Marathi uses the imperfect A — मी घेतो / घेते. Similarly, the yes–no question form of the imperfect A is used for a polite request, e.g., दार लावता का ? ' Will you close the door ? ' These other uses of the imperfect A will not be dealt with here. We will limit ourselves to the use of the imperfect A for habitual action.

Form

The examples in this chapter have been limited for the most part to first and second person forms. Third person forms will be dealt with in the next chapter. Let us look, however, at the overall pattern of the imperfect A.

The formula for a sentence in the imperfect A is $N \quad V - \text{त} - E_{\text{imf}}$, where त is the marker of the imperfect and E_{imf} is the set of personal endings used for the imperfect A. The endings are given in Table 15 below.

Table 15. *Imperfect A endings*

Person	Singular			Plural
	M	F	N	
1	ओ	ए		ओ
2	ओस	एस		आ
3	ओ	ए	अ*	आत

The full paradigm of कर– is given below.

मी करतो	I (*m.*) do
मी करते	I (*f.*) do
तू करतोस	you (*m.*) do
तू करतेस	you (*f.*) do
तो करतो	he, it does
ती करते	she, it does
ते करतं	it does
आम्ही करतो	we do
तुम्ही करता	you do
ते, त्या, ती करतात	they do

This is indicated by an *anusvar* over the final consonant. In formal speech and writing अ is replaced by ए.

Note that gender distinctions are relevant only in the singular, and it is only in the third person singular that all three genders are used.

All verbs are regular in the imperfect A. The only verbs requiring special comment are those for which we have given two alternative bases, one ending in ह, the other in हा, such as राह- / राहा- and पाह- / पाहा-. For these verbs either base may be used for the imperfect A. We have employed the second form, but the first is as frequently used. As neither spelling accurately indicates the pronunciation of ह and the adjoining vowels, you should listen carefully to your instructor's pronunciation.

Imperfect A form of auxiliary

The auxiliary अस- can also be used in the imperfect. It requires considerable practice to decide when to use the present tense (आहे, आहेस, etc.) and when to use the imperfect A (असतो, असते, etc.). However, the following guidelines may be kept in mind.

(1) The present tense is used for definition, identification, and expression of inherent relations.

हे टेबल आहे.	This is a table
सुधीर माझा भाऊ आहे.	Sudhir is my brother.
ही मोसंबी गोड आहेत.	These oranges are sweet.

(2) The present tense is used with adverbial expressions of place to make statements about the immediate present.

दादा घरी आहेत.	Dada is at home (right now).

(3) The imperfect A is used to make statements about something generally true.

दादा सकाळी घरी असतात.	Dada is at home in the morning.
मोसंबी गोड असतात.	Oranges are generally sweet.

See section E for more examples.

Special detail

Note the following sentences.

कशाचा अभ्यास करता ?	What do you study (' of what do you do the study ') ?
कशाची विक्री करता ?	What do you sell (' of what do you do the sale ') ?
आम्ही टाइपरायटरची दुरुस्ती करतो.	We do typewriter repairing.

This use of the abstract noun (**अभ्यास, विक्री, दुरुस्ती**) modified by a possessive in situations where English would simply employ a direct object is quite frequent in Marathi. In some cases Marathi uses both kinds of constructions, with a slight difference in meaning.

तुम्ही टाइपरायटर विकता का ?	Do you sell typewriters ?
तुम्ही टाइपरायटरची विक्री करता का ?	Are you in the business of selling typewriters ?

Vocabulary notes

1. The verbal expressions **शिक-** and **अभ्यास कर-** partially but not completely overlap in meaning. **शिक-** means ' to learn ' and ' to study, ' while **अभ्यास कर-** is ' to study.' In some contexts either can be used.

तुम्ही काय शिकता ?	What do you study ?
तुम्ही कशाचा अभ्यास करता ?	What do you study ?

However, when one is talking about the action of sitting down and studying, the expression used is **अभ्यास कर-**.

बाहेर जाऊ नकोस. अभ्यास कर.	Don't go out. Study.

2. In Marathi हॉटेल is commonly used to mean any kind of restaurant, including a roadside tea shop. The use of हॉटेल in the sense of ' inn ' is more sophisticated.

3. खानावळ refers to a place where meals (but not lodging) are provided on a contract basis.

4. नं is a variant of हून ' from. ' The variation actually has three stages: हून → ऊन → नं. All three forms are in use.

VOCABULARY

इतिहास *m.* history
ओळख- *v.t.* to know, be acquainted with
कशाचं *interrog. adj.* of what
खानावळ, खानावळी *f.*(*i*) boarding house
गोखले Gokhale (a surname)
टाइपरायटर, टाइपरायटर *m.* typewriter
टीव्ही, टीव्ही *m.* television, television set
डबा, डबे *m.* 1. lunch box. 2. packed lunch
डेक्कन जिमखाना *m.* Deccan Gymkhana (a section of Pune)
दादर *n.* Dadar (a suburb of Bombay)
दुरुस्ती *f.* repairing. ० कर- to do repairing
धंदा, धंदे *m.* business, trade
नं See हून.
नोकरी *f.* service
नोकरी, नोकऱ्या *f.* job
बनव- *v.t.* to make, manufacture
बोर्डिंग, बोर्डिंगं *n.* dormitory, hostel*
भाडं, भाडी *n.* rent भाड्यानं दे- to give on rent
भारतीय *adj. inv.* Indian
भाषा, भाषा *f.* language
मजुरी *f.* manual labor
राह-/राहा- *v.i.* to live, stay
ला *post* in, at
विक- *v.t.* to sell
विकत घे- to buy
विक्री *f.* sale ० कर- to sell
शिक-*v.t.* (*sp.*) to study
शिवणकाम *n.* sewing
शेती *f.* farming ० कर- to farm
सध्या *adv.* at present
सरकारी *adj. inv.* government
संस्कृती, संस्कृती *f.* culture
हॉटेल, हॉटेलं *n.* hostel, restaurant

---

* In Indian English students' dormitories are called ' hostels. '

VOCABULARY

Phrases

देवळात	into the temple
साखर कारखान्यात	in the sugar factory
कामाला	at work
कॉलेजला	in college
डेकन जिमखान्यावर	in Deccan Gymkhana
हॉटेलमधे	in a hotel
बोर्डिंगमधे	in a dormitory
घरनं	from home
भाड्यानं	on rent, for rent
भाजीचा धंदा	vegetable business

PRACTICE

A. Go through the imperfect A paradigm of each of the following verbs.

१. कर-
२. जा-
३. ये-
४. जेव-
५. राहा-
६. खा-
७. शिक-
८. शिकव-
९. बनव-

B. For each item a verb or verb phrase is given, followed by a number of pronouns. Give the imperfect A form of the verb required for each pronoun.

१. कर-
(आम्ही) करतो
(तुम्ही) करता
(ती *f.*) करते
(तो) करतो
(तू *m.*) करतोस

२. राहा-
(त्या) राहातात
(ती *n. pl.*) राहातात
(मी *f.*) राहाते
(आम्ही) राहातो
(ते *m. pl.*) राहातात

३. जा–
(मी *m.*) जातो
(ती *f.*) जाते
(तू *f.*) जातेस
(ते *n.*) जातं
(आम्ही) जातो

४. जेव–
(तुम्ही) जेवता
(तो) जेवतो
(तू *m.*) जेवतोस
(मी *f.*) जेवते
(त्या) जेवतात

५. ये–
(तू *f.*) येतेस
(तुम्ही) येता
(ती *n. pl.*) येतात
(आम्ही) येतो
(ते *n.*) येतं

६. वापर–
(ते *pl.*) वापरतात
(मी *m.*) वापरते
(तो) वापरतो
(ती *f.*) वापरते
(आम्ही) वापरतो

C. For each item a pronoun is given, followed by a number of verbs or verb phrases. Give the imperfect A form of the verb required for the pronoun given.

१. तुम्ही
(ये–) येता
(जा–) जाता
(कर–) करता
(राहा–) राहाता
(शिक–) शिकता

२. आम्ही
(कर–) करतो
(राहा–) राहातो
(बोल–) बोलतो
(बनव–) बनवतो
(विक्री कर –) विक्री करतो

३. मी *f.*
(शिक–) शिकते
(शिकव–) शिकवते
(नोकरी कर–) नोकरी करते
(अस–) असते
(विक–) विकते

४. मी *m.*
(ने–) नेतो
(बोल–) बोलतो
(विकत घे–) विकत घेतो
(दुरुस्ती कर–) दुरुस्ती करतो
(शेती कर–) शेती करतो

५. तू *m.*
(जेव–) जेवतोस
(राहा–) राहातोस
(अस–) असतोस
(काम कर–) काम करतोस
(कॉलेजमधे शिक–)
कॉलेजमधे शिकतोस

६. तू *f.*
(बोल–) बोलतेस
(घे–) घेतेस
(आण–) आणतेस
(बघ–) बघतेस
(ऐक–) ऐकतेस

D. Using the verbs below in the imperfect A, ask questions of the pattern **तुम्ही काय** ________.

१. (कर–)
तुम्ही काय करता ?

२. (शिक–)
तुम्ही काय शिकता ?

३. (शिकव–)
तुम्ही काय शिकवता ?

४. (विक–)
तुम्ही काय विकता ?

५. (बनव–)
तुम्ही काय बनवता ?

६. (वाच–)
तुम्ही काय वाचता ?

७. (खा–)
तुम्ही काय खाता ?

८. (पि–)
तुम्ही काय पिता ?

९. (घे–)
तुम्ही काय घेता ?

१०. (वापर–)
तुम्ही काय वापरता ?

E. Repeat exercise D using तू. Do the exercise twice, once with the masculine and once with the feminine.

F. Using the verbs below in the imperfect A, ask questions of the pattern **तुम्ही कुठे** ________.

१. (राहा-)
तुम्ही कुठे राहाता ?

२. (काम कर-)
तुम्ही कुठे काम करता ?

३. (शिक-)
तुम्ही कुठे शिकता ?

४. (शिकव-)
तुम्ही कुठे शिकवता ?

५. (जेव-)
तुम्ही कुठे जेवता ?

६. (बस-)
तुम्ही कुठे बसता ?

७. (अस-)
तुम्ही कुठे असता ?

८. (नोकरी कर-)
तुम्ही कुठे नोकरी करता ?

९. (जा-)
तुम्ही कुठे जाता ?

१०. (कपडे धु-)
तुम्ही कुठे कपडे धुता ?

G. Repeat exercise F using **तू**. Do the exercise twice, once with the masculine and once with the feminine.

H. Using the verb phrases below in the imperfect A, ask questions of the pattern **तुम्ही** ________ **का**. Have a second student answer in the affirmative.

१. (मराठी बोल-)
तुम्ही मराठी बोलता का ?
हो, बोलतो / बोलते.

२. (मराठी शिक-)
तुम्ही मराठी शिकता का ?
हो, शिकतो / शिकते.

३. (मराठी लिहि-)
तुम्ही मराठी लिहिता का ?
हो, लिहितो / लिहिते.

४. (पेपर वाच-)
तुम्ही पेपर वाचता का ?
हो, वाचतो / वाचते.

५. (रेडिओ ऐक-)
तुम्ही रेडिओ ऐकता का ?
हो, ऐकतो / ऐकते.

६. (टीव्ही बघ-)
तुम्ही टीव्ही बघता का ?
हो, बघतो / बघते.

७. (सिनेमाला जा-)
तुम्ही सिनेमाला जाता का ?
हो, जातो / जाते.

८. (देवळात जा-)
तुम्ही देवळात जाता का ?
हो, जातो / जाते.

९. (पुण्याला जा-)
तुम्ही पुण्याला जाता का ?
हो, जातो / जाते.

१०. (मुंबईला ये-)
तुम्ही मुंबईला येता का ?
हो, येतो / येते.

११. (हॉस्टेलमधे राहा-)
तुम्ही हॉस्टेलमधे राहाता का ?
हो, राहातो / राहाते.

१२. (हॉटेलमधे जेव-)
तुम्ही हॉटेलमधे जेवता का ?
हो, जेवतो / जेवते.

१३. (डबा ने-)
तुम्ही डबा नेता का ?
हो, नेतो / नेते.

१४. (शेती कर-)
तुम्ही शेती करता का ?
हो, करतो / करते.

१५. (शिवणकाम कर-)
तुम्ही शिवणकाम करता का ?
हो, करतो / करते.

१६. तुम्ही पवारसाहेबांना
ओळखता का ?
हो, ओळखतो / ओळखते.

I. Answer the following questions as suggested.

१. तुम्ही काय करता ?
(शेती)
शेती करतो / करते.

२. तुम्ही काय करता ?
(भाजीचा धंदा)
भाजीचा धंदा करतो / करते.

३. तुम्ही काय करता ?
(मजुरी)
मजुरी करतो / करते.

४. तुम्ही काय करता ?
(सरकारी नोकरी)
सरकारी नोकरी करतो / करते.

५. तुम्ही काय करता ?
(शिवणकाम)
शिवणकाम करतो / करते.

६. तुम्ही कुठे कामाला असता ?
(साखर कारखान्यात)
साखर कारखान्यात कामाला
असतो / असते.

७. तुम्ही काय शिकता ?
(इतिहास)
मी इतिहास शिकतो /
शिकते.

८. तुम्ही काय शिकता ?
(इंग्रजी)
इंग्रजी शिकतो / शिकते.

९. तुम्ही काय शिकवता ?
(फ्रेंच)
फ्रेंच शिकवतो / शिकवते.

१०. तुम्ही कुठे शिकवता ?
(युनिव्हर्सिटीत)
युनिव्हर्सिटीत शिकवतो / शिकवते.

११. तुम्ही कुठे राहाता ?
(कोल्हापूरला)
कोल्हापूरला राहातो / राहाते.

१२. तुम्ही कुठे राहाता ?
(नागपूरला)
नागपूरला राहातो / राहाते.

१३. तुम्ही कुठे जेवता ?
(घरीच)
घरीच जेवतो / जेवते.

१४. तुम्ही कुठे जेवता ?
(खानावळीत)
खानावळीत जेवतो / जेवते.

J. Translate the following sentences into Marathi. For 'you,' use either the respectful or familiar.

1. What do you do ?
2. Where do you live at present ?
3. Are you in college ?
4. What do you study ?
5. What do you manufacture ?
6. Do you farm ?
7. Do you speak Marathi ?

8. Do you repair bicycles ?
9. I sell cars.
10. I teach English in the university.
11. I study Marathi.
12. I'm at home in the morning.
13. I live in a dormitory.
14. I eat in a boardinghouse.
15. We live in Bombay.
16. We buy old bicycles.
17. We speak Marathi.
18. We study English.
19. We make radios.
20. We study Marathi language and culture.

Chapter Fifteen

The Imperfect A (Cont.)

General third person subject. Cardinal numbers 51–100

SENTENCES

A.	१.	तुमचे वडील काय करतात ?	What does your father do ?
		ते शेती करतात.	He farms.
	२.	तुमच्या आई काय करतात ?	What does your mother do ?
		ती शाळेत शिकवते.	She teaches in school.
		काय शिकवतात ?	What does she teach ?
		गणित शिकवते.	She teaches arithmetic.
	३.	तुमची बहीण काय करते ?	What does your sister do ?
		हायस्कूलमधे शिकते.	She is in high school ('she studies in high school').
	४.	तुमचा भाऊ काय करतो ?	What does your brother do ?
		तो इरिगेशन खात्यात कारकून आहे.	He is a clerk in the irrigation department.
	५.	तुमचा भाऊ कुठे राहातो ?	Where does your brother live ?
		आमच्याकडे राहातो.	He lives with us.

SENTENCES

	६.	तुमची मुलं शाळेत जातात का ?	Do your children go to school ?
		हो, जातात.	Yes, they do.
		ती इंग्रजी शिकतात का ?	Do they study English ?
		हो, शिकतात.	Yes, they do.
	७.	शाळा किती वाजता सुरू होते ?	What time does school start ?
		आठला सुरू होते.	It starts at eight.
B.	८.	छंद म्हणून मुलं काय करतात ?	What do the children do as a hobby ?
	९.	संजय तिकिटं जमवतो.	Sanjay collects stamps.
	१०.	अनुराधा गोष्टी लिहिते आणि चित्रं काढते.	Anuradha writes stories and draws pictures.
	११.	दादा पक्ष्यांचे फोटो काढतो.	Dada takes pictures of birds.
	१२.	विनीता बागकाम करते.	Vineeta does gardening.
	१३.	मुलं कोणकोणते खेळ खेळतात ?	What (all) games do the children play ?
		क्रिकेट आणि खोखो.	They play cricket and kho-kho.
C.	१४.	ऑफिसं अकराला सुरू होतात.	Offices start at eleven.

SENTENCES

१५. बँका अकरा ते तीन चालू असतात.	Banks are open from eleven to three.
१६. ऑफिसात काम करणारे बहुतेक लोक सकाळी लवकर उठतात.	Most people who work in offices ('most people working in offices') get up early in the morning.
१७. उठल्यानंतर ते फक्त चहा घेतात.	After getting up they have only tea.
१८. नंतर ते आंघोळ करतात.	Then they take a bath.
१९. ते सकाळी दहाला जेवतात.	They eat at ten in the morning.
२०. जेवणानंतर कामाला जातात.	After their meal they go to work.
२१. घरी परत आल्यानंतर ते चहा पितात.	After returning home, they drink tea.
२२. संध्याकाळी ते फिरायला जातात.	In the evening they go for a walk.
२३. काही लोक देवळात जातात.	Some people go to the temple.
२४. पुष्कळदा ते सिनेमाला जातात.	They often go to a movie.
२५. रात्री ते उशिरा जेवतात.	At night they eat late.

SENTENCES

२६.	जेवण झाल्यावर ते झोपतात.	After their meal is finished, they go to bed.
D. २७.	मराठीत 'geography' ला काय म्हणतात?	What do they call 'geography' in Marathi?
	भूगोल म्हणतात.	They call it **भूगोल**.
२८.	महाराष्ट्रात किती भाषा बोलतात?	How many languages do they speak in Maharashtra?
	मुख्यतः तीन भाषा बोलतात – मराठी, हिंदी आणि इंग्रजी.	They speak mainly three languages — Marathi, Hindi, and English.
२९.	महाराष्ट्रात गहू खातात का?	In Maharashtra do they eat wheat?
	हो, खातात, पण ज्वारी जास्त खातात.	Yes, they do, but they eat more jowar.
३०.	महाराष्ट्रात कोणकोणती नगदी पिकं लावतात?	In Maharashtra which cash crops do they grow?
	मुख्यतः ऊस आणि कपाशी लावतात.	They grow mainly sugarcane and cotton.
३१.	एसएससीच्या परीक्षेत किती मुलं पास होतात?	How many children pass in the S. S. C. examination?
	सुमारे पन्नास टक्के पास होतात.	Approximately fifty percent pass.

GRAMMAR

This chapter does not introduce any major new grammatical material. It is devoted to reinforcement of the third person forms of the imperfect A which were introduced in the last chapter. Note, however, that respectful forms (e.g., sentences 1 and 2) require the plural form of the verb.

In addition to providing reinforcement of third person forms, this chapter is intended to give some idea of the range of subjects you can talk about once you have mastered the imperfect A and a little more vocabulary.

General third person subject

In speaking about people in general (within a given context) the third person pronoun is often omitted in Marathi. Note that in the equivalent English sentences a pronoun is required. Usually the pronoun used is ' they, ' though often ' we ' may be used with little change of meaning.

महाराष्ट्रात तीन भाषा बोलतात.	They speak three languages in Maharashtra.
मराठीत ' geography 'ला काय म्हणतात ?	What do they call ' geography ' in Marathi ?

New verb forms

This chapter introduces the participle form *V* – ल्यानंतर ' after *V* – ing.'

उठल्यानंतर ते फक्त चहा घेतात.	After getting up they have only tea.
घरी परत आल्यानंतर ते चहा पितात.	After coming back home, they drink tea.
जेवण झाल्यानंतर ते झोपतात.	After their meal is over, they go to bed.

In place of नंतर the postposition वर is also used in this construction.

जेवण झाल्यावर ते झोपतात.	After their meal is over they go to bed.

The details of this form will be discussed in detail in Book Two. For the time being you should simply become familiar with it.

Similarly, in this chapter *V*-आयला has been used for the first time.

संध्याकाळी ते फिरायला जातात.	They go for a walk (' they go in order to take a walk ') in the evening.

V–आयला means ' in order to *V*. ' This construction is taken up in detail in Chapter nineteen.

The verbal adjective form *V*–णारे has been introduced in the sentence below.

ऑफिसात काम करणारे लोक लवकर उठतात.	People who work in offices (' people working in offices ') get up early.

Details of this form will be discussed in Book Two.

Special detail

1. In sentence 8 म्हणून means ' as. '

छंद म्हणून	as a hobby

2. In speaking of someone else's mother one often uses the respectful while in reference to one's own mother one uses the singular. Note the difference in reference to आई in the question and answer below.

तुमच्या आई काय करतात ?	What does your mother do ?
ती शाळेत शिकवते.	She teaches in school.

3. Note the use of कोणकोणती in the example below.

महाराष्ट्रात कोणकोणती नगदी पिकं लावतात ?	What (all) cash crops do they grow in Maharashtra ?
मुख्यतः ऊस आणि कपाशी लावतात.	They grow mainly sugarcane and cotton.

कोणकोणती is a reduplicated form of कोणतं ‘which.’ The use of the reduplicated form suggests that the questioner expects two or more items in answer to his question. Similarly the reduplicated forms काय काय and कोण कोण can also be used.

तुम्ही काय काय लिहिता ?	What (all) do you write ?
गोष्टी आणि लेख.	Stories and articles.
कोण कोण मराठी शिकवतात ?	Who (all) teach Marathi ?
गोखलेबाई आणि पवार सर.	Ms. Gokhale and Mr. Pawar.

4. Note the constructions used for saying ‘at’ . . . o'clock .

शाळा किती वाजता सुरू होते ?	At what time does school start ?
आठला सुरू होते.	It starts at eight.

वाजता is a verb form. It literally means ‘while sounding’ and is derived from the base form वाज– ‘to sound.’

Vocabulary note

The verb हो–, which has been introduced in this chapter, is of major importance. It means among other things ‘to become,’ ‘to happen,’ and ‘to be finished.’ It is frequently used, both as a verb in its own right and as a verb maker in such expressions as सुरू हो– ‘to begin.’

Its perfect form is **झालं**, which has been used in this lesson in the phrase **जेवण झाल्यानंतर** 'after the meal is finished.' The word **झालं** is constantly used.

VOCABULARY

अंकगणित *n.* arithmetic (as distinguished from algebra)
अनुराधा *f.* Anuradha (a given name)
आत *post.* to
आंघोळ, आंघोळी *f.(i)* bath ० **कर**– to take a bath
ऊस *m.* sugarcane
कपाशी *f.* cotton
काढ– *v.t.* 1. to draw. 2. to take (as a photograph)
कोणकोणती *interrog. adj.* which (used when more than one item is expected in reply)
क्रिकेट *n.* cricket
खातं, खाती *n.* department. **इरिगेशन** ० irrigation department
खेळ– *v.i.,v.t.* to play
खेळ, खेळ *m.* game, sport
खोखो *m.* a game of tag played by running around and through a line of squatting players facing alternate directions
गणित *n.* arithmetic, mathematics
गहू *m.* wheat
गोष्ट, गोष्टी *f.(i)* story
चालू *adj. inv.* in motion, running, going on, functioning, open
चित्र, चित्रं *n.* picture. ० **काढ**– to draw a picture
छंद्, छंद् *m.* hobby
जमव– *v.t.* to collect
ज्वारी *f.* jowar, sorghum
झालं perf. of **हो**–
झोप– *v.i.* to sleep, fall asleep
टक्का, टक्के *m.* percent
त See **आत**.
तिकीट, तिकिटं *n.* stamp
ते to, e.g., **एक ते तीन** from one to three
नगदी *adj. inv.* cash
नंतर *post.* after
नापास *adj. inv.* failed. ० **हो**– to fail
पण *conj.* but
परीक्षा, परीक्षा *f.* examination. **एसएससीची** ० the S.S.C. (Secondary School Certificate) examination
पक्षी, पक्षी *m.* bird
पास *adj. inv.* pass. ० **हो**– to pass (an examination)
पीक, पिकं *n.* crop
पुष्कळदा *adv.* often
फिर– *v.i.* 1. to spin. 2. to wander. 3. to travel. **फिरायला जा**– to go for a walk
फुटबॉल *m.* soccer

VOCABULARY

फोटो काढ– to take a photograph
बहुतेक *adj. inv.* the majority
बागकाम *n.* gardening
ब्रेकफास्ट *f.* breakfast. o **घे–** to have breakfast
भूगोल *m.* geography
मका *m., f.* corn (maize)
मुख्यतः *adv.* chiefly, mainly
म्हण– *v.t.* (*irreg.*) to call, designate
म्हणून as
लाव– *v.t.* to plant, grow
लेख, लेख *m.* article
वर *post.* 1. to. 2. after
वाज– *v.i.* to sound, ring. **वाजता** at . . . o'clock
विज्ञान *n.* science
व्हॉलीबॉल *m.* volleyball
संजय *m.* Sanjay (a given name)
साधारणपणे *adv.* generally
सामान्य *adj. inv.* common, general. o **विज्ञान** general science
सुमारे *adv.* approximately
सोयाबीन *n.* soybean
हायस्कूल, हायस्कुलं *n.* high school
हिंदी *n.* the Hindi language
हो– *v.i.* (*irreg.*) 1. to become. 2. to happen. 3. to be finished.
हॉकी *f.* field hockey

Phrases

इरिगेशन खात्यात in the irrigation department
किती वाजता at what time
आठला at eight
दहाला at ten
अकराला at eleven
जेवणानंतर after the meal
आल्यानंतर after coming
उठल्यानंतर after getting up
झाल्यानंतर/झाल्यावर after . . . is over
कामाला to work
एसएससीच्या परीक्षेत in the S.S.C. examination
हायस्कूलच्या परीक्षेत in the high school examination
छंद म्हणून as a hobby
पक्ष्यांचे फोटो pictures of birds
पुष्कळ लोकांच्याकडे in many people's homes
ज्वारीची भाकरी *bhakri* made of jowar
ऑफिसात काम करणारे लोक people who work in offices

Cardinal numbers (51–100)

एक्कावन fifty–one
बावन fifty–two
त्रेपन fifty–three
चोपन fifty–four
पंचावन fifty-five
छप्पन fifty-six
सत्तावन fifty–seven
अठ्ठावन fifty–eight

VOCABULARY

एकोणसाठ	fifty-nine
साठ	sixty
एकसष्ट	sixty-one
बासष्ट	sixty-two
त्रेसष्ट	sixty-three
चौसष्ट	sixty-four
पासष्ट	sixty-five
सहासष्ट	sixty-six
सदुसष्ट	sixty-seven
अडुसष्ट	sixty-eight
एकोणसत्तर	sixty-nine
सत्तर	seventy
एक्काहत्तर	seventy-one
बहात्तर	seventy-two
त्र्याहत्तर	seventy-three
चौऱ्याहत्तर	seventy-four
पंच्याहत्तर	seventy-five
शहात्तर	seventy-six
सत्त्याहत्तर	seventy-seven
अठ्ठ्याहत्तर	seventy-eight
एकोणऐंशी	seventy-nine
ऐंशी	eighty
एक्क्याऐंशी	eighty-one
ब्याऐंशी	eighty-two
त्र्याऐंशी	eighty-three
चौऱ्याऐंशी	eighty-four
पंच्याऐंशी	eighty-five
शहाऐंशी	eighty-six
सत्त्याऐंशी	eighty-seven
अठ्ठ्याऐंशी	eighty-eight
एकोणनव्वद	eighty-nine
नव्वद	ninety
एक्क्याण्णव	ninety-one
ब्याण्णव	ninety-two
त्र्याण्णव	ninety-three
चौऱ्याण्णव	ninety-four
पंच्याण्णव	ninety-five
शहाण्णव	ninety-six
सत्त्याण्णव	ninety-seven
अठ्ठ्याण्णव	ninety-eight
नव्व्याण्णव	ninety-nine
शंभर	one hundred

PRACTICE

A. Use the subjects below in the question pattern _______ **काय करतं.**

१. (तुमची बहीण)
तुमची बहीण काय करते ?

२. (तुमचा भाऊ)
तुमचा भाऊ काय करतो ?

३. (तुमचे वडील)
तुमचे वडील काय करतात ?

४. (तुमच्या आई)
तुमच्या आई काय करतात ?

५. (संजय)
संजय काय करतो ?

६. (अनुराधा)
अनुराधा काय करते ?

७. (तुझी मुलं)
तुझी मुलं काय करतात ?

८. (तुझा मित्र)
तुझा मित्र काय करतो ?

९. (तुमचे यजमान.)
तुमचे यजमान काय करतात ?

१०. (तुमच्या पत्नी)
तुमच्या पत्नी काय करतात ?

B. Use the subjects below in the question pattern ________ **कुठे असतं.**

१. (तुझा भाऊ)
तुझा भाऊ कुठे असतो ?

२. (दीपक)
दीपक कुठे असतो ?

३. (तुझे आईवडील)
तुझे आईवडील कुठे असतात ?

४. (तुमची मुलं)
तुमची मुलं कुठे असतात ?

५. (सुनीता)
सुनीता कुठे असते ?

६. (तुमची बहीण)
तुमची बहीण कुठे असते ?

७. (तुझा अमेरिकन मित्र)
तुझा अमेरिकन मित्र कुठे असतो ?

८. (तुमची मैत्रीण)
तुमची मैत्रीण कुठे असते ?

९. (डॉ. केळकर)
डॉ. केळकर कुठे असतात ?

१०. (कदमबाई)
कदमबाई कुठे असतात ?

C. Answer the following questions as suggested.

१. तुझा भाऊ काय करतो ?
(शेती)
तो शेती करतो.

२. तुमचे यजमान काय करतात ?
(सरकारी नोकरी)
ते सरकारी नोकरी करतात.

३. तुझी बहीण कुठे कामाला असते ?
(कारखान्यात)
ती कारखान्यात कामाला असते.

४. तुमच्या आई कुठे शिकवतात ?
(हायस्कूलमधे)
हायस्कूलमधे शिकवते.

५. अनिल कुठे असतो ?
(पुण्याला)
पुण्याला असतो.

६. छंद म्हणून दादा काय करतात ?
(तिकिटं जमव–)
ते तिकिटं जमवतात.

७. छंद म्हणून मुलं काय करतात ?
(चित्रं काढ–)
चित्रं काढतात.

८. संध्याकाळी मुलं काय करतात ?
(क्रिकेट खेळ–)
क्रिकेट खेळतात.

९. संध्याकाळी लोक कुठे जातात ?
(देवळात)
देवळात जातात.

१०. उठल्यावर लोक काय घेतात ?
(फक्त चहा)
फक्त चहा घेतात.

D. Using the question pattern मराठीत ___ ___ ला काय म्हणतात, ask the Marathi equivalent of each of the following words.

1. history
2. arithmetic
3. general science
4. hockey
5. soccer
6. volleyball
7. bath
8. to sleep*
9. to take a bath
10. to play

---

* When asked this question in regard to a verb, a native speaker of Marathi will answer with the citation form of the verb, which is the verbal noun *V*-णं (formally णे): झोपणं, करणं, etc.

E. Answer the following questions.

१. तुमचे वडील काय करतात ?
२. तुमची आई नोकरी करते का ?
३. तुमचा भाऊ कुठे असतो ?
४. तो काय करतो ?
५. तुमची बहीण कुठे असते ?
६. ती काय करते ?

F. Translate the following sentences into English.

१. मुलं गोष्टी सांगतात.
२. मुलं गाणी म्हणतात.
३. काही मुलं नाच शिकतात.
४. उठल्यानंतर आम्ही ब्रेकफास्ट घेतो.
५. संध्याकाळी आम्ही व्हॉलीबॉल खेळतो.
६. आम्ही रात्री आंघोळ करतो.
७. आमच्याकडे ज्वारी नाही. आम्ही गहू खातो.
८. आमच्याकडे ऊस नाही. आम्ही गहू, सोयाबीन आणि मका लावतो.
९. लोक फक्त इंग्रजी बोलतात.
१०. हायस्कूलच्या परीक्षेत बहुतेक मुलं पास होतात.

G. Answer the following questions about American life.

१. लोक साधारणपणे किती वाजता उठतात ?
२. उठल्यानंतर ते काय घेतात ?
३. सकाळी लवकर जेवतात का ?
४. किती वाजता कामावर जातात ?
५. संध्याकाळी लोक काय करतात ?
६. ज्वारीची भाकरी खातात का ?
७. पुष्कळ लोकांच्याकडे टीव्ही असतो का ?
८. अमेरिकेत किती भाषा बोलतात ?
९. अमेरिकेत कोणकोणते खेळ खेळतात ? *
१०. हायस्कूलच्या परीक्षेत किती टक्के मुलं पास होतात ?

---

* Use English names.

H. Translate the following sentences into Marathi. Throughout this exercise assume that ' they ' refers to 'the children.'

1. The children get up at six.
2. They have breakfast.
3. They take a bath.
4. School starts at eight.
5. They study Marathi, Hindi, English, history, arithmetic and general science.
6. Maharashtrian children study three languages.
7. In school they sing songs and draw pictures.
8. Most children study a lot.
9. In the evening they play outside.
10. After their meal is over, they go to bed.

I. Translate the following phrases into Marathi.

1. fifty-five percent
2. sixty percent
3. eighty-six rupees
4. ninety-eight rupees
5. one hundred rupees

The Imperfect A (Cont.)

Negative of imperfect A. Imperfect participle. Words used with negative

---

SENTENCES

A.	१.	ती मराठी बोलत नाही.	She doesn't speak Marathi.
	२.	ते पेपर वाचत नाहीत.	He doesn't read the paper.
	३.	बाळ फारसं दूध पीत नाही.	The child doesn't drink much milk.
	४.	ती मुलं फारशी रडत नाहीत.	Those children don't cry very much.
	५.	ती फारशी हसतही नाहीत.	They don't smile very much either.
	६.	अमेरिकन लोक ज्वारी खात नाहीत.	Americans don't eat jowar.
	७.	ही डाळ लवकर शिजत नाही.	This *dal* doesn't cook quickly.
	८.	आम्ही मटण खात नाही.	We don't eat meat.
	९.	ते दारू पीत नाहीत.	They don't drink alcoholic beverages.
	१०.	ते सिगारेट ओढत नाहीत.	They don't smoke cigarettes ('a cigarette').
	११.	ते मूर्तिपूजा करत नाहीत.	They don't do idol worship.
	१२.	पुरुष लहान मुलांना संभाळत नाहीत.	Men don't take care of small children.

SENTENCES

	१३. पुरुष रोजचा स्वैपाक करत नाहीत.	Men don't do every-day cooking.
	१४. ते लोक विहिरीवर पाणी भरत नाहीत.	Those people don't fill water at the well.
	१५. माझं घड्याळ चाल्त नाही.	My watch doesn't work.
	१६. फाटक्या नोटा चाल्त नाहीत.	Torn notes aren't acceptable. (' don't go ').
	१७. मास-मच्छर आमच्यात चाल्त नाही.	Non-vegetarian food is not permitted among us.
	१८. मला तिखट चाल्त नाही.	I can't take hot (food).
B.	१९. ती अभ्यास करत नाही.	She doesn't study.
	२०. मुलं नियम्तिपणे येत नाहीत.	The children don't come regularly.
	२१. तो आईवडलांना पैसे पाठवत नाही.	He doesn't send money to his parents.
	२२. ते चांगले शिकवत नाहीत.	He doesn't teach well.
	२३. मुलं ऐक्त नाहीत.	The children don't listen.
C.	२४. आम्ही सहसा तिक्डे येत नाही.	We usually don't go there.
	२५. ती सहसा चुका करत नाही.	She usually doesn't make mistakes.

SENTENCES

२६.	तो सहसा चालत येत नाही, सायकलवर येतो.	He generally doesn't walk (' come walking '); he comes on a bicycle.
२७.	शाळेत मुलं अजिबात लक्ष देत नाहीत.	In school the children pay absolutely no attention.
२८.	मुलं लक्ष देतच नाहीत.	The children just don't pay attention.
२९.	ते इतरांच्याकडनं कधी मदत मागत नाहीत.	They never ask for help from others.
३०.	मी देवळात कधी जात नाही.	I never go to the temple.
३१.	तो कधीच पत्रं लिहीत नाही.	He just never writes letters.
३२.	त्याला कोणी विचारत नाही.	Nobody gives him any importance.

GRAMMAR

Negative of imperfect A

The negative of the imperfect A has the form *N V-त Aux.*

ती मराठी बोलत नाही.	She doesn't speak Marathi.
ते पेपर वाचत नाहीत.	He doesn't read the paper.

Note that in the negative there is no indication of gender. Only the indication of number is preserved — and that in the auxiliary.

A sentence in this construction can be made more emphatic by putting नाही before the verb.

ती नाही बोलत.	She doesn't speak.

In this construction, as elsewhere, the subject can be omitted when it is understood.

Imperfect participle

The form *V-त* we shall refer to as the imperfect participle. This participle is, for the most part, regular. For bases endinq in आ or ए, त is added without any other change being required.

Base	Imperfect participle
खा-	खात
जा-	जात
ये-	येत

If the base ends in इ or उ, the vowel is lengthened before त.

Base	Imperfect participle
पि-	पीत
धु-	धूत

Verbal bases ending in a consonant require the addition of a vowel before त is added. Generally, the vowel added is अ. (This formulation refers to speech. In writing it is not necessary to write the अ separately, for when त is added the final consonant of the base becomes non-final, and its inherent vowel is pronounced, thus giving the required अ.) Here are some examples.

Base	Imperfect participle
बोल-	बोलत
कर-	करत
फेक-	फेकत

A few common verbs sometimes employ ई rather than अ for the imperfect participle.

Base	Imperfect participle
कर-	करीत
पाठव-	पाठवीत
भर-	भरीत

In this book we will use both forms.

There is considerable variation in the writing of the imperfect participle of those verbs which have ह in the base form. This variation does not indicate differences in pronunciation; it is due to the fact that the script has no way of indicating that intervocalic ह tends to combine with the adjoining sounds. Thus we see such variations as the following.

राहत	रहात	राहात
पाहत	पहात	पाहात

We have generally used the third alternative.* The verb लिह- / लिही- is always written with ई— लिहीत.

Words used with negative

Adverbs. The adverb सहसा 'usually, generally' is used only with the negative. In addition, there are a number of adverbs used frequently though not exclusively) with the negative.

कधी . . . नाही	never
अजिबात . . . नाही	not at all
फारसं . . . नाही	not very much

फारसं** and also चांगलं 'well' belong to the small class of adverbs which are variable. These adverbs use the regular adjective endings. Generally they agree with the subject.

Pronoun. The pronoun कोण is replaced by कोणी in negative sentences. In such sentences the pronoun usually has an indefinite sense.

त्याला कोणी विचारत नाही.	Nobody gives him any importance.

Particles. The particle ही 'too, also' means 'either' when used with the negative.

ती फारशी हसतही नाहीत.	They don't smile very much either.

---

* It will be recalled that in Chapter seven we said that it was necessary to posit two base forms for verbs with ह. Thus the verbs given here have the base forms राह-/राहा- and पाह/-पाहा-. If we take the second form as the base for the imperfect participle, the forms राहात and पाहात are quite regular.

** फारसं and चांगलं are, of course, also adjectives.

The emphatic particle च can be inserted between the imperfect participle and the negative auxiliary.

तो माझ्याशी बोलतच नाही.	He doesn't even speak to me.
आम्ही मटण खातच नाही.	We don't eat meat at all.

Vocabulary notes

1. The auxiliary अस–, as we have already seen, has a negative counterpart नस–. Just as अस– can be used in the imperfect, so can नस–.

ते इथे असतात.	He stays here.
ते इथे नसतात.	He doesn't stay here,

2. The verb चाल– basically means ‘ to walk . ’ In the sentence below it is used in this basic meaning.

सहा महिन्यांचं मूल चालत नाही.	A six–month–old child doesn't walk.

In place of चाल– the combined forms चालत ये– and चालत जा– (‘to come/go on foot ’) are often used. See sentence 26 for an example.

In addition to the basic sense of ‘ walk ’ चाल– has a number of derived meanings.

(1) to work, run, function

माझं घड्याळ चालत नाही.	My watch doesn't work.

(2) to be acceptable currency

फाटक्या नोटा चालत नाहीत.	Torn notes aren't acceptable.

(3) to be permissible (as a custom* or habit)

मास–मच्छर आमच्यात चालत नाही.	Non-vegetarian food is not permitted among us.
मला तिखट चालत नाही.	I can't take hot (food).

* There is also a related noun चाल, चाली *f*. (*i*) meaning ‘custom.’

3. The verb मागा– ‘ to ask for ’ requires the postposition कडून ‘ from ’ on the indirect object.

ते इतरांच्याकडून मदत मागत नाहीत.	They don’t ask for help from others.

In speech, कडून is often replaced by कडनं.

ते इतरांच्याकडनं मदत मागत नाहीत.

4. The form मराठीतून (मराठी + आत + ऊन) means ‘ through Marathi.’

5. Normally an adjective is used with the noun it qualifies. In some cases, however, the noun is not expressed but understood.

मला तिखट चालत नाही.	I can’t take hot (food).
ते इतरांच्याकडनं कधी मदत मागत नाहीत.	They never ask help from other (people).

VOCABULARY

अजिबात *adv.* completely, absolutely, at all

अमेरिकन *adj. inv.* American

इतर *adj. inv.* other

ओढ– *v.t.* 1. to pull, drag. 2. to smoke

कोणी *pron.* anybody. o नाही nobody

कॅमेरा, कॅमेरे *m.* camera

चांगलं *adv. var.* well

चाल– *v i.* 1. to walk. 2. to work, run, function. 3. to be acceptable currency. 4. to be permissible (as a custom or habit)

चालत ये– to come on foot

चालत जा– to go on foot

चूक, चुका *f.*(*i*)[*] mistake. o कर– to make a mistake

डाळ, डाळी *f.*(*i*) split, dried beans

दारू *f.* liquor, alcoholic beverages

[*] This word is irregular in that its plural follows the *f.*(*e*) class and its oblique form the *f.*(*i*) class.

VOCABULARY

नियमितपणे *adv.* regularly
नोट, नोटा *f.(e)* currency note, bill
पूजा *f.* ritual worship. o **कर–** to do ritual worship
फाटकं *adj.* torn, ragged
बीफ *n.* beef
भर– *v.t.* to fill
मटण *n.* mutton, goat meat, meat
मास *n.* flesh, meat
मास–मच्छर *m.* non-vegetarian food (lit., flesh and fish)
मूर्तिपूजा *f.* idol worship
मूर्ती, मूर्ती *f.* idol, image
रड– *v.i.* to cry
रोज *adv.* daily, every day
रोजचं *adj.* everyday
लक्ष *n.* attention. o **दे** – to pay attention
विचार– *v.t.* to give importance
शिज– *v.i.* to cook
संभाळ– *v.t.* to take care of
सहसा *adv.* generally, usually (used with neg.)
सिगारेट, सिगारेटी *f.(i)* cigarette
स्वैपाक *m.* cooking, preparation of meals o **कर–** to cook, prepare meals
हस– *v.i.* to smile, laugh
ही *part.* either (with neg.)

Phrases

विहिरीवर at the well
सायकलवर on a bicycle
आईवडलांना to (one's) parents
आईवडलांकडून from (one's) parents
इतरांच्याकडून from others
मराठीतून through Marathi
सहा महिन्यांचं मूल a six-month-old child

PRACTICE

A. Give the imperfect participle of each of the following verbs.

१. (कर–) करत
२. (बोल–) बोलत
३. (वापर–) वापरत
४. (ये–) येत
५. (जा–) जात
६. (पि–) पीत
७. (धु–) धूत
८. (ऐक–) ऐकत
९. (दे–) देत
१०. (घे–) घेत

११. (आण-) आणत
१२. (झोप-) झोपत
१३. (बघ-) बघत
१४. (पाहा-) पाहात
१५. (राहा-) राहात
१६. (लिही-) लिहीत
१७. (सांग-) सांगत
१८. (उघड-) उघडत
१९. (हस-) हसत
२०. (रड-) रडत

B. Negate each of the following sentences.

१. (मी पुण्यात राहातो/ राहाते.)
मी पुण्यात राहात नाही.

२. (लोक रेडिओ ऐकतात.)
लोक रेडिओ ऐकत नाहीत.

३. (ते इथे असतात.)
ते इथे नसतात.

४. (मुलं अभ्यास करतात.)
मुलं अभ्यास करत नाहीत.

५. (ते आम्हाला मदत करतात.)
ते आम्हाला मदत करत नाहीत.

६. (तो पत्रं लिहितो.)
तो पत्रं लिहीत नाही.

७. (मला तिखट चालतं.)
मला तिखट चालत नाही.

८. (मी स्वैपाक करतो/करते.)
मी स्वैपाक करत नाही.

९. (ते दारू पितात.)
ते दारू पीत नाहीत.

१०. (ही डाळ लवकर शिजते.)
ही डाळ लवकर शिजत नाही.

C. Answer the following questions, using the Marathi equivalent of the English answer suggested.

१. अमेरिकेत पुरुष मुलांना संभाळतात का ?
(They generally don't.)
सहसा संभाळत नाहीत.

२. पुरुष रोजचा स्वैपाक करतात का ?
(They generally don't.)
सहसा करत नाहीत.

३. पुरुष विहिरीवर पाणी भरतात का ?
(They generally don't.)
सहसा भरत नाहीत.

४. भारतीय बायका दारू पितात का ?
(They generally don't.)
सहसा पीत नाहीत.

५. भारतीय बायका सिगारेट ओढतात का ?
(They genrally don't.)
सहसा ओढत नाहीत.

६. भारतीय लोक मटण खातात का ?
(They don't eat very much.)
फारसं खात नाहीत.

७. तुमचे लोक बीफ खातात का ?
(No, they don't at all.)
नाही, अजिबात खात नाहीत.

८. तुम्ही लोक मूर्तिपूजा करता का ?
(No, we don't at all.)
नाही, अजिबात करत नाही.

९. युनिव्हर्सिटीत मराठीतून शिकवतात का ?
(No, they usually don't.)
नाही, सहसा शिकवत नाहीत.

१०. वर्गात विद्यार्थी सिगारेट ओढतात का ?
(No, they never do.)
नाही, कधी ओढत नाहीत.

D. Translate the following sentences into English.

१. ते लोक सहसा चुका करीत नाहीत.
२. मुलं नियमितपणे शाळेत जात नाहीत.
३. तो फोटो काढत नाही, चित्रं काढतो.
४. ते आईवडलांकडनं मदत मागत नाहीत.
५. ती कधी हसत नाही.
६. मुलं फारसं रडत नाहीत.
७. तो कधी वेळेवर येत नाही.
८. आमच्याकडे मटण चालत नाही.
९. त्यांना कोणी मदत करत नाहीत.
१०. आता त्याला कोणी विचारत नाही.

E. Translate the following sentences into Marathi.

1. She doesn't speak to me.
2. The students don't study regularly.
3. You pay absolutely no attention.*
4. They don't ask (their) parents for help.
5. I don't come walking. I come on a bicycle.
6. I don't go there very much.
7. My camera doesn't work.
8. He doesn't talk very much.
9. I don't usually smoke (cigarettes.)
10. We don't usually eat meat.
11. We don't eat eggs either.
12. She never works.
13. I don't even watch television.
14. He speaks very well.
15. The examinations usually aren't difficult.

---

* Use familiar.

Adverbs with the Imperfect A

Adverbs meaning ' at present. ' Adverbial expressions of frequency

---

SENTENCES

A.	१.	सध्या आम्ही नागपूरला असतो.	At present we live in Nagpur.
	२.	हल्ली रोज संध्याकाळी वीज जाते.	Nowadays the electricity goes off every evening.
	३.	अलिकडे फोन सारखा बिघडतो.	These days the phone constantly goes out of order.
B.	४.	तुम्ही रोज मंडईत जाता का ?	Do you go to the vegetable market every day ?
		हो, रोज जातो/जाते.	Yes, I go every day.
	५.	बाजार केव्हा भरतो ?	When is the bazar held ?
		दर रविवारी भरतो.	It is held every Sunday.
	६.	तुम्ही रोज मटण खाता का ?	Do you eat meat every day ?
		नाही, आठवड्यातून एकदा खातो.	No, (we) eat it once a week.

SENTENCES

७.	अमेरिकेत लोक दररोज मटण खातात का ?	In America do people eat meat every day ?
	हो, पुष्कळ लोक रोज दोनदाही खातात.	Yes, many people eat it even twice a day.
८.	तुम्ही रोज कपडे धुता का ?	Do you wash clothes every day ?
	हो, धुतो.	Yes, (we) do.
९.	तुम्ही कधी सिनेमाला जाता का ?	Do you ever go to a movie ?
	हो, अधनंमधनं जातो / जाते.	Yes, I go now and then.
१०.	तुम्ही पुण्याला किती वेळा जाता ?	How often do you go to Pune ?
	महिन्यातून दोनदा (जातो / जाते).	(I go) twice a month.
११.	तुम्ही मुंबईला कधी जाता का ?	Do you ever go to Bombay ?
	वर्षातनं एकदा जातो / जाते.	I go once a year.
१२.	तुम्ही माहेरी केव्हा जाता ?	When do you go to your mother's home ?
	माहेर जवळच आहे म्हणून पंधरवड्यातनं एकदा जाते.	My mother's home is nearby, so I go once a fortnight.

SENTENCES

१३.	आजी-आजोबा दरवर्षी पंढरपूरला जातात का ?	Do Grandmother and Grandfather go to Pandharpur every year ?
	हो, जातात.	Yes, they do.
१४.	सुट्टीमधे तुम्ही काय करता ?	What do you do during vacation ?
	आम्ही प्रवास करतो – कधी उत्तरेकडे तर कधी दक्षिणेकडे.	We travel — sometimes to the North, and sometimes to the South.
१५.	तुझे तास आठवड्यातनं किती दिवस असतात ?	How many days a week do you have class ('how many days are your class periods ') ?
	सहा दिवस.	Six days.
१६.	विद्यार्थी फावल्या वेळात काय करतात ?	What do the students do in their spare time ?
	ते कधी नाटकाला किंवा मैफलीला जातात, तर कधी हॉटेलमधे बसून गप्पा मारतात.	They sometimes go to a play or a concert, sometimes they sit in a cafe and chat.
C. १७.	महाराष्ट्रात उन्हाळा केव्हा सुरू होतो ?	In Maharashtra when does summer start ?
	साधारणपणे मार्चअखेर सुरू होतो.	Generally it starts at the end of March.

SENTENCES

१८.	उन्हाळ्यात ऊन नेहमी कडक असतं का ?	In summer is the sun always very hot ?
	हो, बहुतेक ठिकाणी असतं.	Yes, in most places it is.
१९.	उन्हाळ्यात खूप वाराही असतो का ?	In summer is there a lot of wind too ?
	हो, भयंकर वारा असतो.	Yes, there's terrific wind.
२०.	हिवाळ्यात हवा कशी असते ?	What is the weather like in winter ?
	फारच चांगली असते.	It's very pleasant.
२१.	अमेरिकेत हिवाळ्यात खूप थंडी असते का ?	In America is it always very cold ('is there always a lot of cold ') in winter ?
	उत्तरेकडे असते, दक्षिणेकडे तितकी नसते.	There is in the North, not so much in the South.
२२.	इथे पावसाळ्यात रोज पाऊस पडतो का ?	Here in the rainy season does it rain (' does the rain fall ') every day ?
	रोज पडतोच असं नाही. दोन-तीन दिवस पडतो, मग दोन-तीन दिवस कोरडे जातात.	It's not that it rains every day (' it rains every day, it's not like that '). It rains for two or three days then there's a gap of two or three days (' two or three days remain dry. ')

SENTENCES

२३.	पावसाळ्यात सारखा पाऊस पडतो का ? कधीकधी / कधीमधी दिवसभर पडतो, पण बहुतेक वेळा फक्त दुपारी पडतो.	In the rainy season does it rain constantly ? Sometimes it rains all day long, but usually it rains only in the afternoon.
D. २४.	ते पुष्कळदा आम्हाला मदत करतात.	They often help us.
२५.	आम्ही क्वचित तिकडे जातो.	We go there once in a while.
२६.	आम्ही क्वचितच तिकडे जातो.	We seldom go there.
२७.	विद्यार्थी बहुधा चार विषय शिकतात.	Students usually study four subjects.
२८.	मुलं रोज व्यायाम करतात.	The children exercise every day.
२९.	त्यांच्या गोष्टी नेहमी चांगल्या असतात.	Their/his/her stories are always good.
३०.	दर शनिवारी टीव्हीवर सिनेमा असतो.	Every Saturday there's a movie on television.

SENTENCES

३१. तो दर वेळी उशिरा येतो.	Every time he comes late.
३२. दर चार तासांनी हे औषध घ्या.	Take this medicine every four hours.
३३. दोन-दोन गोळ्या चार-चार तासांनी घ्या.	Take two tablets every four hours.
३४. भर दिवसा चोऱ्या होतात.	Thefts occur in broad daylight.
३५. भर दुपारी ती शेतात काम करते.	She works in the field at the height of the afternoon.

GRAMMAR

Adverbs meaning 'at present'

Since the imperfect A is limited to habitual action in the present tense, those adverbs meaning 'at present,' 'nowadays,' etc., are used almost exclusively with the imperfect A. The most common of these adverbs are listed below.

सध्या	at present	हल्ली	nowadays
अलिकडे	these days		

The English translations are, of course, only rough approximations. The three Marathi words are more or less synonymous.

These adverbs come at the beginning of the sentence or, alternatively, after the subject. See section A for examples of their use.

Adverbial expressions of frequency

While the adverbs discussed above are associated almost exclusively with the imperfect A, there is another large set of adverbs and adverbial expressions often associated with the imperfect A. These adverbial expressions usually have to do with frequency.

Adverbial expressions of frequency generally immediately follow the subject and precede adverbs of place, adjectives, and direct objects.* Note the examples below.

तुम्ही रोज मंडईत जाता का ?	Do you go to the vegetable market every day ?
उन्हाळ्यात ऊन नेहमी कडक असतं का ?	In the summer is the sun always very hot ?
तुम्ही रोज कपडे धुता का ?	Do you wash clothes every day ?

---

Note that there is no distinction of gender in the future tense.

The full paradigm of the future tense of अस- is given below.

मी असेन	I will be
तू असशील	you will be
तो, ती, ते असेल	he, she, it will be
आम्ही असू	we will be
तुम्ही असाल	you will be
ते, त्या, ती असतील	they will be

---

* The future of other verbs is introduced in Chapter twenty-three.

The full paradigm of **नस**– is given below.

मी नसेन	I will not be
तू नसशील	you will not be
तो, ती, ते नसेल	he, she, it will not be
आम्ही नसू	we will not be
तुम्ही नसाल	you will not be
ते, त्या, ती नसतील	they will not be

Special detail.

1. Note the construction for saying ‘ *X* has time. ’

मला वेळ आहे.	I have time.
रामला वेळ आहे.	Ram has time.
तुला वेळ आहे का ?	Do you have time ?

The words **काम** ‘ work ’ and **सवड** ‘ free time ’ are used in the same construction.

मला काम आहे.	I have work.
मला सवड आहे.	I am free (‘ have free time ’).

2. Note the ways of expressing estimates of numbers.

दहा–बारा लोक असतील.	There will probably be ten or twelve people.
भाडं पन्नासेक रुपये असेल.	The rent will be fifty rupees or so.

Vocabulary note

भाडं means ‘ rent, ’ as for a house, car, bicycle, etc. It is also used to refer to the charge for a hotel room, taxi, ticket, etc.

VOCABULARY

उघडं *adj.* open
कदाचित *adv.* perhaps
काश्मीर *n.* Kashmir
घोरपडे Ghorpade (a surname)
दुसरं *adj.* second
न्यूयॉर्क *n.* New York
पोस्ट ऑफिस, पोस्ट ऑफिसं *n.* post office
फार *adv.* very
फार तर at the most
बंब, बंब *m.* water heater
बहुतेक *adv.* probably
भाडं, भाडी *n.* rent, charge, fare
मोकळं *adj.* free, unengaged
लीला *f.* Leela (a given name)
विस्तव *m.* fire. o **घाल**– to fire, supply with fuel
शिल्लक *adj. inv.* left, remaining
सवड *f.* (*i*) free time, leisure

Phrases

पुढच्या रविवारी next Sunday
किती वाजेपर्यंत until what time
चारपर्यंत until four
नऊपर्यंत until nine
शंभर रुपयांची साडी a hundred–rupee sari
बंबात in the water heater
ऑगस्ट महिन्यात in August
मे महिन्यात in May
खोलीचं भाडं charge for the room, room rent
पन्नासेक रुपये fifty rupees or so
घोरपड्यांचे वडील Ghorpade's father
देशपांड्यांच्या आई Deshpande's mother
त्या वेळेला at that time
किती वर्षांचं how (many years) old
बारा वर्षांचं twelve years old
ह्या कपाटात in this cupboard
आंघोळीला for a bath

PRACTICE

A. Give the future tense form of the auxiliary that goes with each pronoun or noun. Go through the exercise twice, first with the affirmative, then with the negative.

१. (तू)
असशील
नसशील

२. (मी)
असेन
नसेन

३. (तो)
असेल
नसेल

४. (आम्ही)
असू
नसू

५. (ती *f.*)
असेल
नसेल

६. (तुम्ही)
असाल
नसाल

७. (ते *m.*)
असतील
नसतील

८. (ते *n.*)
असेल
नसेल

९. (त्या *f.*)
असतील
नसतील

१०. (ती *n.*)
असतील
नसतील

११. (साहेब)
असतील
नसतील

१२. (बाई)
असतील
नसतील

१३. (मुलगा)
असेल
नसेल

१४. (दुकानं)
असतील
नसतील

१५. (गाडी)
असेल
नसेल

B. Answer the following questions in the affirmative.

१. तू उद्या सकाळी घरी असशील का ?
हो, असेन.

२. साहेब आज दुपारी ऑफिसमधे असतील का ?
हो, असतील.

३. उद्या बँक उघडी असेल का ?
हो, असेल.

४. तुम्ही उद्या संध्याकाळी मोकळे / मोकळ्या असाल का ?
हो, असेन.

५. ताई उद्या इथे असेल का ?
हो, असेल.

६. काश्मीरमधे आता खूप थंडी असेल का ?
हो, असेल.

७. मे महिन्यात नागपूरमधे फार उकाडा असेल का ?
हो, असेल.

८. उद्या तुला वेळ आहे का ?
हो, आहे.

९. आज दुपारी तुम्ही ऑफिसमधे आहात का ?
हो, आहे.

१०. उद्या साहेबांना सवड असेल का ?
हो, असेल.

११. रविवारी कारखाना चालू आहे का ?
हो, आहे.

१२. शनिवारी तू इथे आहेस का ?
हो, आहे.

C. Answer the following questions in the negative.

१. तिथे खूप गर्दी असेल का ?
नसेल.

२. आता न्यूयॉर्कमधे फार थंडी असेल का ?
नसेल.

३. खोलीचं भाडं फार असेल का ?
नसेल.

४. तुझ्याबरोबर आणखी कोणी असेल का ?
नसेल.

D. Answer the following questions as suggested, using the future forms of the auxiliary.

१. उद्या सकाळी बाई कुठे असतील ?
(ऑफिसमधे)
ऑफिसमधे असतील.

२. ती पुस्तके कुठे आहेत ?
(ह्या कपाटात)
ह्या कपाटात असतील.

३. माझं पैशाचं पाकीट कुठे आहे ?
(आतमधे)
आतमधे असेल.

४. मुली कुठे आहेत ?
(आजीकडे)
आजीकडे असतील.

५. त्या कोण आहेत ?
(देशपांडयांच्या आई)
देशपांडयांच्या आई असतील.

६. माझी किल्ली कुठे असेल ?
(टेबलावर)
टेबलावर असेल.

E. Answer the following questions as suggested, using the future form of the auxiliary.

१. तो मुलगा किती वर्षांचा आहे ?
(He must be six.)
सहा वर्षांचा असेल.

२. हा पायजमा कोणाचा आहे ?
(It must be Anil's.)
अनिलचा असेल.

३. तू पंधरा तारखेला इथे असशील का ?
(Yes, I will.)
हो, असेन.

४. दुकानं किती वाजेपर्यंत उघडी असतील ?
(Until nine.)
नऊपर्यंत.

५. तुझ्याकडे किती दूध शिल्लक आहे ?
(I must have half a liter.)
अर्धा लिटर असेल.

F. Answer the following questions as suggested, using the present tense of the auxiliary.

१. तुला केव्हा सवड आहे ?
(Tomorrow morning.)
उद्या सकाळी आहे.

२. उद्या सुट्टी आहे का ?
(Yes, it is.)
हो, आहे.

३. सोमवारी आपला तास आहे का ?
(No, Monday is a holiday.)*
नाही, सोमवारी सुट्टी आहे.

४. तू उद्या मोकळा/मोकळी आहेस का ?
(I have some work tomorrow but have some free time on Friday.)
मला उद्या काम आहे पण शुक्रवारी सवड आहे.

५. तुला केव्हा वेळ आहे ?
(I have time tomorrow evening.)
उद्या संध्याकाळी आहे.

G. Translate the following sentences into Marathi.

1. I will be in the office all day tomorrow.
2. Will you be free tomorrow ?
3. Tomorrow I have some work.
4. Will the post office be open tomorrow ?
5. My brother will be in the U. S. next year.
6. The bus will probably be crowded.
7. The examination will probably be difficult.
8. The car isn't likely to be ready yet.
9. Perhaps the books are in this cupboard.
10. The water must be warm. Go for a bath.
11. There must be four hundred students in the school.
12. The room rent must be sixty rupees or so.
13. Ziasaheb must be in the factory.
14. There's not likely to be any rain in Bombay now.
15. Is it likely to be cold in Kashmir ?

---

* Say ' there is a holiday on Monday. '

Chapter Twenty-two

The Prospective

The prospective of अस- *and* नस-

SENTENCES

A. १.	तुम्ही इथे किती दिवस राहाणार आहात ?	How long are you going to stay here ?
	सहा महिने.	Six months.
२.	तुम्ही काय करणार आहात ?	What are you going to do ?
	आम्ही मराठी संस्कृतीचा अभ्यास करणार आहोत.	We are going to study Marathi culture.
३.	तू संध्याकाळी जेवायला येणार आहेस का ?	Are you coming to eat this evening ?
	हो, येणार आहे.	Yes, I am.
४.	तू सिनेमाला येणार आहेस नं ?	You're coming to the movie, aren't you ?
	नाही, मी अभ्यास करणार आहे.	No, I'm going to study.
५.	तुझी परीक्षा केव्हा होणार आहे ?	When is your exam going to be ?
	पुढच्या महिन्यात.	Next month.

SENTENCES

६.	आज तू काय करणार आहेस ?	What are you going to do today ?
	एका खेड्यात जाणार आहे.	I'm going to a village.
७.	पाण्यासाठी शेतकरी काय करणार आहेत ?	What are the farmers going to do for water ?
	नवीन विहिरी खणणार आहेत.	They are going to dig some new wells.
८.	तुम्ही सुट्टीमधे कुठे जाणार आहात ?	Where are you going to go during vacation ?
	आग्र्याला आणि दिल्लीला.	To Agra and Delhi.
९.	तुम्ही एकटे/एकट्या जाणार आहात का ?	Are you going to go alone ?
	नाही, आम्ही तिघं-चौघं मिळून जाणार आहोत.	No, three or four of us are going together.
१०.	तुम्ही विमानानं जाणार का ?	Are you going to go by plane ?
	नाही, रेल्वेनी.	No, by rail.
११.	किती तारखेला निघणार ?	On what date are you leaving ?
	पंचवीस तारखेला.	On the twenty-fifth.

SENTENCES

१२.	दिल्लीला तुम्ही किती तारखेला पोचणार आहात ? सव्वीस तारखेला.	On what date are you going to arrive in Delhi ? On the twenty-sixth.
१३.	दिल्लीला कुठे उतरणार आहात ? एका मित्राकडे.	Where are you going to stay in Delhi ? With a friend.
B. १४.	तू लग्नाला येणार असशील.	You must be coming to the wedding.
१५.	तुम्ही नाटकात भाग घेणार असाल.	You're undoubtedly going to take part in the play.
१६.	ती शनिवारी निघणार असेल.	She's most likely leaving on Saturday.
१७.	तो बहुतेक मुंबईला जाणार नसेल.	He's most probably not going to Bombay.
१८.	मुलं आज क्रिकेट खेळणार असतील.	The children are most likely going to play cricket today.
C. १९.	त्या झोपडपट्टीत जाऊ नकोस. अशा ठिकाणी जाणं चांगलं नसतं. मी जाणार.	Don't go to that shanty-town. It's not nice to go to such places. I'm *going* to go.

SENTENCES

२०.	ती साडी घेऊ नकोस. सहा महिनेसुद्धा टिकणार नाही.	Don't buy that sari. It won't last even six months.
	मी घेणार.	I'm *going* to buy it.
२१.	स्कूटर घेऊ नकोस. शहरात स्कूटर चालवणं फार धोक्याचं आहे.	Don't get a scooter. It's very dangerous to drive a scooter in the city.
	मी घेणार.	I'm *going* to get it.
D. २२.	मी उद्या इथे नसणार आहे.	I'm not going to be here tomorrow.
२३.	जत्रेमधे खूप गर्दी असणार आहे. घाबरून जाऊ नकोस.	There's going to be a big crush at the *jatra*. Don't get scared.
२४.	बसमधे खूप धूळ असणार आहे. डोक्याला बांधण्यासाठी स्कार्फ घेऊन जा.	There's going to be a lot of dust on the bus. Take along a scarf to tie on (your) head.
E. २५.	ती साडी खूप छान आहे. खूप महाग असणार.	That sari is very nice. It must be very expensive.

SENTENCES

२६. गरम कपडे घेऊन जा. पुढच्या महिन्यात काश्मीरमधे थंडी असणार.	Take along some warm clothes. It's very likely to be cold in Kashmir next month.
२७. मटण मागवू नकोस. फार तिखट असणार.	Don't order mutton. It's very likely to be hot.
२८. अन्वर कुठे आहे ? तो दुकानात असणार.	Where is Anwar? He must be in the store.

GRAMMAR

Formation of the prospective

This chapter introduces the prospective. This is a typical participial construction, with a participle indicating the aspect and the auxiliary indicating the tense. The prospective participle णार is used for action felt as imminent. Its nearest English equivalent is '*going to V.*'

मी उद्या येणार आहे.	I am going to come tomorrow.

The formula for the prospective is *N V*-णार *Aux* '*N* (be) going to *V.*' The auxiliary may be in the present, past, or future tense. The form of the auxiliary is governed by the person and number (and in the case of the past tense, by the gender) of *N*.

The full paradigm of ये- in the prospective with the present auxiliary is given below.

मी येणार आहे	I am going to come
तू येणार आहेस	you are going to come
तो, ती, ते येणार आहे	he, she, it is going to come
आम्ही येणार आहोत*	we are going to come
तुम्ही येणार आहात	you are going to come
ते, त्या, ती येणार आहेत	they are going to come

All verbal bases are regular before णार. The only thing to keep in mind is that लिह- / लिहि- uses the second alternant. Thus the participle is लिहिणार.

Negative. The negative of the prospective is formed by using the negative auxiliary.

मी येणार नाही	I'm not going to come

---

* In informal speech many people say आम्ही येणार आहे and तुम्ही येणार आहे.

Contracted form. In speech, when the present auxiliary is used with the prospective participle, a contracted form of the participle is used. Note the contracted forms of the prospective of ये– with the present auxiliary.

मी येणाराय
तू येणारायस
तो, ती, ते येणाराय
आम्ही येणारौत / येणाराओत / येणाराय
तुम्ही येणाराहात / येणाराय
ते, त्या, ती येणारयत

Use of prospective

Used with the present auxiliary, the prospective functions as a kind of future. Like the English 'going to *V*,' it conveys more immediacy and definiteness than does the simple future.* See section A for examples.

When there is a discourse with a number of verbs in the prospective, the auxiliary is sometimes dropped in later sentences. We have an example of this in the sentences on travel plans (sentences 8 to 11). In the first two questions the auxiliary is used, while in the next two it is dropped.

With the past auxiliary, the prospective is used for action that was felt as imminent in the past ('it was going to rain,' 'I was going to come to your place, but . . .'). This form will not be dealt with here.

Used with the future auxiliary, the prospective expresses the presumption that an action is imminent.

तू लग्नाला येणार असशील.	You must be coming to the wedding.

---

* The future is introduced in Chapter twenty-three.

The use of this form in the first person does not seem appropriate, perhaps because a person knows his own intentions and does not have to surmise about them. See section B for more examples.

The prospective may be used without the auxiliary. This has the effect of leaving the time of the action unspecified and of focusing on the action itself. Note, for example, the following exchange.

त्यांना एक कारकून पाहिजे.	They want a clerk.
ते किती पगार देणार ?	How much salary are they going to pay ?

The prospective without the auxiliary often has an emphatic or defiant tone. See section C for examples.

Prospective of अस- and नस-

Like other verbs, the verbs अस- and नस- can be used in the prospective. They can be used with the present or future auxiliaries or by themselves without the auxiliary.

The full paradigm of the prospective of अस- with the present auxiliary is given below.

मी असणार आहे	I am going to be
तू असणार आहेस	you are going to be
तो, ती, ते असणार आहे	he, she, it is going to be
आम्ही असणार आहोत	we are going to be
तुम्ही असणार आहात	you are going to be
ते, त्या, ती असणार आहेत	they are going to be

The full paradigm of the prospective of नस- with the present auxiliary is as follows.

मी नसणार आहे	I am not going to be
तू नसणार आहेस	you are not going to be
तो, ती, ते नसणार आहे	he, she, it is not going to be
आम्ही नसणार आहोत	we are not going to be
तुम्ही नसणार आहात	you are not going to be
ते, त्या, ती नसणार आहेत	they are not going to be

Used with the present auxiliary, the prospective of अस- is more definite than the future.

तो उद्या इथे असेल.	He'll be here tomorrow.
तो उद्या इथे असणार आहे.	He'll be here tomorrow (definitely).

See section D for the use of अस- and नस- with the present auxiliary.

Used without the auxiliary, असणार expresses an inference. For example, consider the sentence below.

अन्वर दुकानात असणार.	Anwar must be in the store.

This sentence suggests that the speaker knows something about Anwar's habits or about his plans for that particular day, and on the basis of that concludes that Anwar must be in the store.

Note that this sentence and several others in section E refer to present time. Unlike असणार आहे, which can only refer to the future, असणार can refer to both the present and future. For an example of its use in reference to the future, see sentence 26.

Special detail

1. विमानानं in sentence 10 means ‘by plane’ and रेल्वेनी means ‘by rail.’ नं and नी are variants of the instrumental postposition.

2. The forms जाणं ‘to go’ in sentence 19 and चालवणं ‘to drive’ in sentence 21 are verbal nouns. Similarly बांधण्यासाठी ‘in order to tie’ in sentence 24 is a verbal noun with a postposition attached.*

3. घाबरून जा- in sentence 23 is a compound verb meaning practically the same thing as the simple verb घाबर- ‘to become frightened.’

4. The question tag नं / ना can be added onto a statement to express ‘aren't you,’ ‘isn't he,’ etc.

तू येणार आहेस नं ?	You're coming, aren't you ?
ती येणार आहे ना ?	She's coming, isn't she ?

---

* See *MRG,* pp. 167—68.

Vocabulary notes

1. There are special words for 'two,' 'three,' and 'four' when they refer to people.

दोघं	two
तिघं	three
चौघं	four

These are variable adjectives, but they employ a special set of endings.

masculine	ए
feminine	ई
neuter	अ

दोघे भाऊ	(*m.*)	two brothers
तिघी मुली	(*f.*)	three girls
चौघं भावंडं	(*n.*)	four siblings

When people of both sexes are referred to together, the neuter is used.

आम्ही तिघं-चौघं मिळून जाणार आहोत.

VOCABULARY

अन्वर *m.* Anwar (a given name)
असं *adj.* such
अशा *f. pl.* of असं
आग्रा *n.* Agra
आयेशा *f.* Ayesha (a given name)
उतर– *v.i.* to halt, put up
एकटं *adj.* alone
खण– *v.t.* to dig
खेडं, खेडी *n.* village
घाबर– *v.i.* to become frightened
चालव– *v.t.* to drive
चौघं *adj.* four (of persons)
जत्रा, जत्रा *f.* religious fair

झोपडपट्टी, झोपडपट्ट्या *f.* shantytown, slum
टिक– *v.i.* to last
डोकं, डोकी *n.* head
तिघं *adj.* three (of persons)
दुसरं *adj.* other, else
दोघं *adj.* two (of persons)
धूळ *f.*(*i*) dust
धोक्याचं *adj.* dangerous
पगार *m.* salary
पोच– *v.i.* to arrive
बांध– *v.t.* to tie
भाग *m.* part. ० घे– to take part

VOCABULARY

मागव– *v.t.* to order
मिळून *adv.* together
रेल्वे *f.* railroad
लग्न, लग्नं *n.* 1. marriage. 2. wedding
विमान, विमानं *n.* airplane
शहर, शहरं *n.* city
स्कार्फ, स्कार्फ *m.* scarf

Phrases

एका खेड्यात in a village
एका मित्राकडे at a friend's, with a friend
शहरात in the city
त्या झोपडपट्टीत in that shantytown
जत्रेमधे in the *jatra*
सुट्टीमधे during vacation
नाटकात in the play
अशा ठिकाणी in such a place/in such places
डोक्याला on the head
लग्नाला to the wedding
बांधण्यासाठी in order to tie
पाण्यासाठी for water
विमानानी / विमानानं by plane
रेल्वेनी / रेल्वेनं by rail
शेतकऱ्यांशी to the farmers

PRACTICE

A. Give the prospective participle of each of the following verbs.

१. (कर–)
करणार
२. (जा–)
जाणार
३. (घे–)
(घेणार)
४. (दाखव–)
दाखवणार
५. (दे–)
देणार
६. (वाच–)
वाचणार
७. (मदत कर–)
मदत करणार
८. (जेव–)
जेवणार
९. (लिहि–)
लिहिणार
१०. (ठेव–)
ठेवणार
११. (मागव–)
मागवणार
१२. (पाठव–)
पाठवणार
१३. (पाहा–)
पाहाणार
१४. (सांग–)
सांगणार
१५. (चौकशी कर–)
चौकशी करणार

B. Give the form of the prospective of अस- that goes with each noun phrase. Use the present auxiliary. Go through the exercise a second time, giving the forms of नस-.

१. (तू)
असणार आहेस
नसणार आहेस

२. (आम्ही)
असणार आहोत
नसणार आहोत

३. (मी)
असणार आहे
नसणार आहे

४. (तो)
असणार आहे
नसणार आहे

५. (तुम्ही)
असणार आहात
नसणार आहात

६. (तुझी मैत्रीण)
असणार आहे
नसणार आहे

७. (साहेब)
असणार आहेत
नसणार आहेत

८. (मुलं)
असणार आहेत
नसणार आहेत

९. (सगळे शिक्षक)
असणार आहेत
नसणार आहेत

१०. (राम आणि मी)
असणार आहोत
नसणार आहोत

C. Using the subjects suggested, put the verb phrase given into the prospective. Use the present auxiliary.

१. कॉलेजवर जा-

(मी) मी कॉलेजवर जाणार आहे.
(आम्ही) आम्ही कॉलेजवर जाणार आहोत.
(तुम्ही ?) तुम्ही कॉलेजवर जाणार आहात का ?
(सुनीता) सुनीता कॉलेजवर जाणार आहे.
(मुलं) मुलं कॉलेजवर जाणार आहेत.

२. फिरायला जा–

(आम्ही सगळेजण)	आम्ही सगळेजण फिरायला जाणार आहोत.
(तू ?)	तू फिरायला जाणार आहेस का ?
(आई-बाबा)	आई-बाबा फिरायला जाणार आहेत.
(मी)	मी फिरायला जाणार आहे.
(तुम्ही ?)	तुम्ही फिरायला जाणार आहात का ?

३. आज रात्री उशिरा ये–

(मी)	मी आज रात्री उशिरा येणार आहे.
(आयेशा)	आयेशा आज रात्री उशिरा येणार आहे.
(आम्ही)	आम्ही आज रात्री उशिरा येणार आहोत.
(माझे मित्र)	माझे मित्र आज रात्री उशिरा येणार आहेत.
(तू ?)	तू आज रात्री उशिरा येणार आहेस का ?

D. Using the subject given, put the verb phrases suggested into the prospective. Use the present auxiliary.

१. मी

(चहा घे–)	मी चहा घेणार आहे.
(टेप्स ऐक–)	मी टेप्स ऐकणार आहे.
(देशपांड्यांना बोलाव–)	मी देशपांडयांना बोलावणार आहे.
(खेडयात जा–)	मी खेड्यात जाणार आहे.
(शेतकऱ्यांशी बोल–)	मी शेतकऱ्यांशी बोलणार आहे.

२. तू (?)

(जेवायला ये–)	तू जेवायला येणार आहेस का ?
(फुटबॉल खेळ–)	तू फुटबॉल खेळणार आहेस का ?
(तिला फोन कर–)	तू तिला फोन करणार आहेस का ?
(हॉटेलमधे उतर–)	तू हॉटेलमधे उतरणार आहेस का ?
(गाडी चालव–)	तू गाडी चालवणार आहेस का ?

३. मुलं (?)

(आज दुपारी ये-)	मुलं आज दुपारी येणार आहेत का ?
(शॉपिंग करायला जा-)	मुलं शॉपिंग करायला जाणार आहेत का ?
(टीव्ही बघ-)	मुलं टीव्ही बघणार आहेत का ?
(पुढच्या वर्षी शाळेत जा-)	मुलं पुढच्या वर्षी शाळेत जाणार आहेत का ?
(शहर बघायला ये-)	मुलं शहर बघायला येणार आहेत का ?

४. तुम्ही (?)

(कुठे जा-)	तुम्ही कुठे जाणार आहात ?
(कसे / कशा जा-)	तुम्ही कसे / कशा जाणार आहात ?
(किती वाजता ये-)	तुम्ही किती वाजता येणार आहात ?
(कोणाला भेट-)	तुम्ही कोणाला भेटणार आहात ?
(काय मागव-)	तुम्ही काय मागवणार आहात ?

E. Answer the questions formed in exercise D.

F. Complete the following questions by putting the verb given into the prospective with the prospective with the present auxiliary. Have a second student give any appropriate answer.

१. (जा-) तू कुठे ________ ?
तू कुठे जाणार आहेस ?

२. (जा-) तू विमानानी ________ का ?
तू विमानानी जाणार आहेस का ?

३. (उतर-) तू कोणाकडे ________ ?
तू कोणाकडे उतरणार आहेस ?

४. (राहा-) तू किती दिवस ________ ?
तू किती दिवस राहाणार आहेस ?

५. (पोच-) तू पुण्याला किती तारखेला ________ ?
तू पुण्याला किती तारखेला पोचणार आहेस ?

G. Answer the following questions as suggested. Use the prospective with the future auxiliary.

१. अन्वरसाहेब केव्हा येणार आहेत ?
(पुढच्या आठवड्यात)
पुढच्या आठवड्यात येणार असतील.

२. किती विद्यार्थी भाग घेणार आहेत ?
(पाच-सहा)
पाच-सहा घेणार असतील.

३. गाडी वेळेवर पोचणार आहे का ?
(हो, बहुतेक)
हो, बहुतेक वेळेवर पोचणार असेल.

H. Translate the following exchanges into English.

१. आपली परीक्षा केव्हा होणार आहे ?
पुढच्या आठवड्यात.

२. तसं करू नकोस.
मी करणार.

३. तो केव्हा येणार आहे ?
सोमवारी येणार असेल.

४. किती पैसे शिल्लक राहणार आहेत ?
काही शिल्लक राहणार नाहीत.

५. छत्री नेऊ का ?
हो, खूप पाऊस असणार आहे.

६. खोलीचं भाडं खूप असणार का ?
नाही, फार नसणार.

७. तुझी मैत्रीण एकटी येणार आहे का ?
हो, एकटी येणार असेल.

I. Translate the following sentences into Marathi.

1. Tomorrow I am going to a *jatra*.
2. Two or three friends are going to come to dinner.
3. Ten people are going to take part.
4. John is going to drive the car.
5. Are you going to come to see the city ?
6. They are going to go by plane.
7. It's going to be hot.
8. My sister is going to be in America next year.
9. The exam isn't likely to be hard.
10. You must want some hot water.
11. Deepak is coming tomorrow, isn't he ?
12. I'm not going into town today.
13. How many people are going to come ?
14. It's going to rain today.
15. Are you going to dig a well ?

Chapter Twenty-three

The Future Tense

Formation and use of future tense

SENTENCES

A.	१.	मी उद्या सकाळी तुझ्याकडे येईन.	I'll come to your place tomorrow morning.
	२.	तुम्ही केव्हा परत याल ?	When will you come back ?
	३.	तू माझ्याबरोबर येशील का ?	Will you come with me ?
	४.	तो परवा तुझी गाठ घेईल.	He will meet you the day after tomorrow.
	५.	बाई किती दिवसांत परत येतील ?	When (' in how many days ') will Bai be back ?
	६.	गाडी दिल्लीला किती वाजता पोचेल ?	What time will the train reach Delhi ?
	७.	मी पुढच्या आठवड्यात पत्र पाठवीन.	I'll send (you) a letter next week.
	८.	मी तुम्हाला सहाला उठवीन.	I will get you up at six.
	९.	मी तुला हाक मारीन.	I'll call you.
	१०.	तुझ्यासाठी फ्रॉक शिवीन.	I'll sew a dress for you.
	११.	त्या काचेशी खेळू नकोस. ती फुटेल.	Don't play with that piece of glass. It will break.
	१२.	दार आपटू नकोस. ते मोडेल.	Don't bang the door. It will break.

SENTENCES

१३.	दोरी ओढू नकोस. ती तुटेल.	Don't pull the rope. It will break.
१४.	काट्यांतून चालू नकोस, साडी फाटेल.	Don't walk through the thorns. Your sari will tear.
१५.	पैसे खिशात ठेव, नाहीतर हरवतील.	Put the money in your pocket. Otherwise it will get lost.
१६.	तिकीट नीट चिकटव, नाहीतर ते निघेल.	Stick the stamp on properly. Otherwise it will come off.
१७.	कार्यक्रम किती वाजता संपेल ?	What time will the program end ?
१८.	आमची परीक्षा एप्रिलमधे होईल.	Our exam will be in April.
१९.	परीक्षेचा निकाल जूनमधे लागेल.	The result of the exam will be out in June.
२०.	दहा-पंधरा दिवसांत पावसाळा सुरू होईल.	In ten or fifteen days the monsoon will start.
२१.	पाऊस आल्यानंतर आपण झाडं लावू.	After the rain comes, we will plant the trees.
२२.	(जर) पाऊस लवकर आला नाही तर दुष्काळ पडेल.	If it doesn't rain soon there will be a drought.
B. २३.	भिऊ नका. कुत्रा चावणार नाही.	Don't be afraid. The dog won't bite.

SENTENCES

२४.	काळजी करू नकोस. आई रागवणार नाही.	Don't worry. Mother won't be angry.
२५.	तीन दिवस सुट्टी आहे म्हणून सोमवारपर्यंत आपलं काम होणार नाही.	There's a holiday for three days, so our work won't be done until Monday.
C. २६.	कितीजण येणार आहेत ?	How many people are coming ?
	बहुतेक सहाजण येतील.	Most probably six people will come.
२७.	नागपूरचे पाहुणे किती तारखेला येणार आहेत ?	On what date are the guests from Nagpur coming ?
	सात-आठ तारखेला येतील.	They will probably come on the seventh or eighth.
२८.	तुझं काम केव्हा संपणार आहे ?	When is your work going to be done ?
	सहा महिन्यांत संपेल.	It will be done in six months.
२९.	तुम्ही ह्या कामासाठी किती पगार देणार ?	What salary are you going to give for this work ?
	सहाशे रुपये देऊ.	We will give six hundred rupees.

SENTENCES

D. ३०. तू माझं एक काम करशील ?	Will you do something for me ('do my one job') ?
३१. तुम्ही मला स्टेशनवर सोडाल का ?	Will you drop me at the station ?
३२. मला पाणी उकळून घाल का ?	Will you boil some water for me ?
३३. तू मला मदत करशील का ?	Will you help me ?

GRAMMAR

Formation of the future tense

As we have already indicated, the future is a unitary verb construction rather than an aspectual one. Aspectual constructions, you will recall, consist of a verb base plus an aspectual marker (e.g., –त, –णार) and an auxiliary (which is sometimes omitted). With these constructions the tense is indicated by the auxiliary. The future, on the other hand, consists of the verbal base and a set of personal endings. It may itself be considered a tense.

The formula for the future is $N\ V{-}E_f$, where E_f stands for the set of future endings presented in Table 19 below.

Table 19. *Future endings*

Person	Singular	Plural
1	ईन, एन	ऊ
2	शील	आल
3	ईल, एल	तील

Note that there are no gender distinctions in the paradigm. The only variation is in the first and third person singular where there is a choice of endings with ई or ए. The ई endings are used for verbal bases ending in a vowel or a vowel plus ह, and for most transitive verbs. For other verbs the ए endings are used. Study the paradigms below.

Bases using ई

(1) जा– (base ending in vowel)

मी जाईन	आम्ही जाऊ
तू जाशील	तुम्ही जाल
तो, ती, ते जाईल	ते, त्या, ती जातील

(2) राह–* (base containing ह)

मी राहीन	आम्ही राहू
तू राहशील	तुम्ही राहाल
तो, ती, ते राहील	ते, त्या, ती राहतील

(3) कर– (transitive verb)

मी करीन	आम्ही करू
तू करशील	तुम्ही कराल
तो, ती, ते करील	ते, त्या, ती करतील

Bases using ए

(1) पोच–

मी पोचेन	आम्ही पोचू
तू पोचशील	तुम्ही पोचाल
तो, ती, ते पोचेल	ते, त्या, ती पोचतील

(2) निघ–

मी निघेन	आम्ही निघू
तू निघशील	तुम्ही निघाल
तो, ती, ते निघेल	ते, त्या, ती निघतील

As we have already seen, the auxiliary verbs अस– and नस– fall into the category of verbs employing ए rather than ई.

When ई is added to a base ending in च, the च is palatalized. This is an instance of Rule M_5.

वाच्-	to read
वाचीन	I will read
वाचील	he, she will read

---

* For those endings that begin with a consonant (i. e. second person singular and the third person plural) the राहा– alternant may be used.

Negative

The future tense has no negative form. To negate a sentence in the future one must use the prospective.

मी करीन.	I will do it.
मी करणार नाही.	I won't do it.
तो येईल	He will come.
तो येणार नाही.	He won't come.

Use of the future tense

Like the prospective, the future tense is used for future action. However, as we noted in discussing the prospective, the future tense is used for action felt as less imminent or more remote. See section A for examples of the future, and B for examples of the negative. See section C for the contrast between the prospective and the future.

Requests. A yes–no question in the future may be used for making a polite request.

तू माझं एक काम करशील का ?	Will you do something for me ('do my one job') ?

Note that English also uses the future in such a request. There is a difference, however, in the English and Marathi usage. In English one uses the future even for a request referring to the immediate present, e.g., 'will you help me lift this table ?' In Marathi, on the other hand, the future is employed for a request only when the action referred to is in the future. For a request relating to the immediate present, Marathi employs the imperfect A.

हे टेबल उचलायला मदत करता का ?	Will you help me lift this table ?

See section D for examples of Marathi requests using the future.

Special detail

1. In this chapter we encounter conditional (' if ') sentences for the first time. Note especially sentence 22.

(जर) पाऊस लवकर आला	If it doesn't rain soon
नाही तर दुष्काळ पडेल.	there will be a drought.

Sentences 15 and 16 also employ the conditional, though in a somewhat elliptical form. For a discussion of the conditional, see *MRG*, pp. 160-62.

2. Note that names of days and the months of the Roman calendar remain unchanged when a postposition is added. Numbers also need not change.*

सोमवारपर्यंत	until Monday
एप्रिलमध्ये	in April
जूनमधे	in June
सहाला	at six

3. Note that in the oblique form of खिसा the स is replaced by श.

खिसा	pocket
खिशात	in the pocket

The same change is found with कसं.

कसं	how
कशासाठी	for what purpose

4. A compound verb of the form *V*-ऊन दे- often has the sense ' to do for someone. ' This is the case with उकलून दे- in sentence 32.

5. Note that a yes-no question may be indicated merely by the intonation at the end of the sentence, without using का, as in sentence 30.

---

* Some speakers use oblique forms for numbers—e. g., एकाला, दोनाला, etc.

Vocabulary notes

1. There are several words to express the intransitive sense of ‘to break.’ Note the sentences below.

काच फुटेल.	The piece of glass will break.
खुर्ची मोडेल.	The chair will break.
दोरी तुटेल.	The rope will break.

फुट- refers to shattering, as of glass or pottery, and also to the breaking of a balloon. मोड- refers to the breaking of rigid objects, and तुट- to the snapping of long objects, such as ropes, beams, etc. While फुट- and तुट- are used only as intransitive verbs, मोड- is both transitive and intransitive.

2. The verb हरव- is both intransitive and transitive. As an intransitive verb it means ‘to be lost,’ and as a transitive verb it means ‘to lose.’ See sentence 15 for an example of its use as an intransitive verb.

3. Note the use of निघ- in sentence 16. Here it means ‘to come off.’

4. The verb लाग- is the intransitive counterpart of लाव-, and like the latter it has a great many meanings, many of which do not seem to be related to each other. The central idea seems to be that of a contact or connection being made. In the case of निकाल लाग- it means simply ‘to come out.’

5. In Marathi the sense ‘how long’ is often expressed by किती दिवस ‘how many days.’ This is true even when the expected answer is in terms of years. Note the use of this phrase in sentence 5.

6. The word दुष्काळ we have glossed as ‘drought, famine.’ Literally it means ‘bad time.’ It can refer to a time of distress caused by too much rain as well as too little. The former is referred to as ओला दुष्काळ ‘wet famine.’ Note that the verb used with दुष्काळ is पड-.

7. The word कुत्रा refers specifically to a male dog, and कुत्री to a

female dog. There is also a neuter form **कुत्रं**, used when the gender of the dog is indeterminate or irrelevant.

8. **पाहुणा** means 'male guest' and **पाहुणी** 'female guest.' For respectful reference one may use the plural forms.

9. **जण** is a suffix added to numerals referring to people. Note the question and answer in sentence 26 where we find **कितीजण** 'how many people' and **सहाजण** 'six people.' **जण** can be used as masculine, feminine, or neuter (though it is doubtful whether it would ever be used as neuter singular) It has the following plural forms: **जण** *m.*, **जणी**, *f*, and **जणं** *n*.

VOCABULARY

आपट– *v.t.* to bang
उकळ– *v.i.*, *v.t.* to boil
उठव– *v.t.* to wake up, get up
ओलं *adj*. wet
काच, काचा *f*.(*e*) piece of glass
काटा, काटे *m*. thorn
कार्यक्रम, कार्यक्रम *m*. program
काळजी *f*. worry. o **कर–** to worry
कितीजण *interrog*. *m*. *pl*. how many people
कुत्रं, कुत्री *n*. dog
कुत्रा, कुत्रे *m*. male dog
कुत्री, कुत्र्या *f*. female dog
खिसा, खिसे *m*. pocket
चाव– *v.t.*, *v.t.* (*sp*.) to bite
चिकटव– *v.t.* to stick
जण *m*., *f*., *n*. *suff*. a person, individual (preceded by a numeral)
जणं *n*. *pl*. of **जण**
जणी *f*. *pl*. of **जण**

जर *conj*. if
तर *conj*. then
तुट– *v.i*. to break
दुष्काळ *m*. drought, famine. o **पड–** for a drought to occur. **ओला** o famine caused by too much rain
दोरी, दोऱ्या *f*. rope
नाहीतर *adv*. otherwise
निकाल, निकाल *m*. result. o **लाग–** for a result to come out
निघ– *v.i*. to come off
नीट *adv*. properly, neatly
पाहुणा, पाहुणे *m*. guest
पाहुणी, पाहुण्या *f*. guest
फाट– *v.i*. to tear
फुट– *v.i*. to break, shatter
फ्रॉक, फ्रॉक *m*. dress, frock
भि– *v.i*.(*irreg*.) to be afraid
मोड– *v.i*., *v.t*. to break
रागव– *v.i*. to get angry. *v.t*. to scold

VOCABULARY

लाग- *v.i.* to come out
विशेष *adj. inv.* special
शिव- *v.t.* to sew
संप- *v.i.* to end, be finished
हरव- *v.i.* to be lost. *v.t.* to lose
हाक, हाका *f* (*e*) call. ∘ **मार-** to call

Phrases

किती दिवस how long (' how many days ')
किती दिवसांत when (' in how many days ')
दहा-पंधरा दिवसांत in ten or fifteen days
सहा महिन्यांत in six months
मुलाला to the child
त्या काचेशी with that piece of glasss
काट्यांतून through the thorns
खिशात in the pocket
परीक्षेचा निकाल the result of the examination
नागपूरचे पाहुणे the guests from Nagpur
ह्या कामासाठी for this work
पाऊस आल्यानंतर after the rain comes

PRACTICE

A. Go through the future paradigm of the following verbs or verb phrases.

१. कर-
२. जा-
३. ये-
४. पाठव-
५. वापर-
६. चौकशी कर-
७. त्यांच्याशी बोल-
८. विचार-
९. सांग-

B. Using the subjects suggested, form the future tense of the verb or verb phrase given. If the subject is in the second person make the sentence a question.

१. घे-
(मी) मी घेईन.
(तुम्ही) तुम्ही घ्याल का?
(पाहुणे) पाहुणे घेतील.
(तुमचा मित्र) तुमचा मित्र घेईल.
(तुझ्या मैत्रिणी) तुझ्या मैत्रिणी घेतील.
(तू) तू घेशील का?

२. अभ्यास कर–

(तू)	तू अभ्यास करशील का ?
(तुमची मुलं)	तुमची मुलं अभ्यास करतील.
(आम्ही)	आम्ही अभ्यास करू.
(मी)	मी अभ्यास करीन.
(माझी बहीण)	माझी बहीण अभ्यास करील.
(तुम्ही)	तुम्ही अभ्यास कराल का ?

३. वाच–

(आम्ही)	आम्ही वाचू.
(मुली)	मुली वाचतील.
(मी)	मी वाचीन.
(तू)	तू वाचशील का ?
(लोक)	लोक वाचतील.
(आई)	आई वाचील.

४. रागव–

(साहेब)	साहेब रागवतील.
(मी)	मी रागवेन.
(तुम्ही)	तुम्ही रागवाल का ?
(लोक)	लोक रागवतील.
(सगळेजण)	सगळेजण रागवतील.
(आई)	आई रागवेल.

C. Make the following sentences negative.

१. (मी आज संध्याकाळी जेवायला येईन.)
मी आज संध्याकाळी जेवायला येणार नाही.

२. (निकाल वेळेवर लागेल.)
निकाल वेळेवर लागणार नाही.

३. (दुष्काळ पडेल.)
दुष्काळ पडणार नाही.

४. (दोरी तुटेल.)
दोरी तुटणार नाही.

५. (बाटल्या फुटतील.)
बाटल्या फुटणार नाहीत.

६. (ती काळजी करील.)
ती काळजी करणार नाही.

७. (कुत्रा चावेल.)
कुत्रा चावणार नाही.

८. (लोक ऐकतील.)
लोक ऐकणार नाहीत.

९. (तो भिईल.)
तो भिणार नाही.

१०. (ते घर विकतील.)
ते घर विकणार नाहीत.

D. Complete the following questions by putting the verb given into the future tense. Have a second student give any appropriate answer.

१. (हो-) पावसाळा केव्हा सुरू _______ ?
होईल

२. (ये-) तुमचे पाहुणे केव्हा _______ ?
येतील

३. (लाग-) परीक्षेचा निकाल केव्हा _______ ?
लागेल

४. (दे-) ते किती पगार ______ ?
देतील

५. (उठव-) उद्या तू मला ______ का ?
उठवशील

६. (संप-) कार्यक्रम किती वाजता ______ ?
संपेल

E. Translate the following sentences into Marathi.

1. Will you come to my place tomorrow ?
2. I will meet him next week.
3. Will you phone me tomorrow ?
4. Will you leave me at the bus stand ?
5. Will you boil some water for her ?
6. I'll call you at six tomorrow morning.
7. I'll sew a kurta for you.
8. Put the money in your pocket. Otherwise it will get lost.
9. What time will the program start ?
10. What salary will they give ?
11. Mother won't worry.
12. Will your father be angry ?
13. The result of the exam will not be out on time.
14. The glass will break.
15. The dog will not bite.

Chapter Twenty-four

The Informal Imperfect B

Formation and use of informal imperfect B. Ordinal numbers

SENTENCES

A. १.	तू काय करतोयस / करत्येयस ?	What're you doing ?
	मी पत्र लिहितोय / लिहित्येय.	I'm writing a letter.
२.	आई काय करत्येय ?	What's Mother doing ?
	ती पेरू तोडत्येय.	She's picking guavas.
३.	मुलं काय करतायत ?	What are the children doing ?
	ती बाहेर खेळतायत.	They're playing outside.
४.	मुलं अभ्यास करतायत का ?	Are the children studying ?
	नाही, ती पतंग उडवतायत.	No, they're flying kites.
५.	नंदा काय करत्येय ?	What's Nanda doing ?
	ती धुणं धुत्येय.	She's doing the washing.
६.	किसन काय करतोय ?	What's Kisan doing ?
	तो मका भिजवतोय.	He's irrigating the corn.

SENTENCES

७.	तुम्ही काम करताय का ?	Are you working ?
	नाही, आम्ही नुसत्या गप्पा मारतोय.	No, we're just chatting.
८.	साहेब काय करतायत ?	What is Saheb doing ?
	पूजा करतायत.	He's doing *puja*.
९.	मुलं काय करतायत ?	What are the children doing ?
	पत्ते खेळतायत.	They're playing cards.
१०.	तुमचं काम झालंय का ?	Is your work finished ?
	नाही, होतंय.	No, it's getting there.
११.	पाऊस पडतोय का ?	Is it raining ?
	हो, झिमझिम पडतोय.	Yes, it's raining lightly.
B. १२.	ती माणसं काय करतायत ?	What are those men doing ?
	मासे पकडतायत.	They're catching fish.
१३.	त्या बायका काय करतायत ?	What are those women doing ?
	त्या खुरपण करतायत.	They're weeding (' doing weeding').

SENTENCES

१४.	ते गडी काय करतायत ?	What are those workmen doing ?
	उसाची लागण करतायत.	They're planting sugarcane (' doing the planting of sugarcane ').
१५.	तिथे काय करतायत ?	What are they doing there ?
	गूळ तयार करतायत.	They're making jaggery.
१६.	हा कशाचा आवाज आहे ?	What is this noise ('of what is this noise ') ?
	गाढव ओरडतंय.	A donkey is braying.
१७.	हा कुठला पक्षी ओरडतोय ?	What bird is singing ?
	कोकीळ.	A cuckoo.
C. १८.	मी ललिता बोलत्येय. मीना तिथं आहे का ?	This is Lalita speaking (' I Lalita am speaking '). Is Meena there ?
१९.	मी केळकर बोलतोय. पवार साहेब तिथे आहेत का ?	This is Kelkar speaking. Is Pawar Saheb there ?
D. २०.	माझं पोट दुखतंय.	I have a stomach ache (' my stomach is aching ').
२१.	माझे पाय दुखतायत.	My feet hurt (' are hurting ').

SENTENCES

२२.	माझा घसा दुखतोय.	I have a sore throat (' my throat is hurting ').
२३.	मला खोकला येतोय.	I have a cough (' a cough is coming to me ').
E. २४.	सध्या तू काय करतोयस / करत्येयस ?	What are you doing these days ?
	मी बँकेत नोकरी करतोय / करत्येय.	I'm working in a bank.
२५.	सध्या काय लिहिताय ?	What are you writing these days ?
	कादंबरी लिहितोय / लिहित्येय.	I'm writing a novel.
२६.	सुधीर हल्ली काय करतोय ?	What's Sudhir doing these days ?
	तो बी. एस्‌सी. करतोय.	He's doing his B. Sc.
२७.	तुमची बहीण काय करत्येय ?	What's your sister doing ?
	ती कारखान्यात कामाला असते.	She's at work in a factory.

SENTENCES

२८.	तुमचा भाऊ काय करतोय?	What's your brother doing?
	काही नाही. तो नोकरी शोधतोय.	Nothing. He's looking for a job.
२९.	सध्या तू कुठे राहातोयस / राहात्येयस ?	Where are you living at present?
	मी रविवार पेठेत राहातोय / राहात्येय.	I'm living in Ravivar Peth.
३०.	काय विशेष?	What's new (' what's special ')?
	आम्ही नवीन घर बांधतोय.	We're building a new house.
३१.	तुम्ही काय करताहात इथे?	What are you doing here?
	आम्ही मराठी शिकतोय.	We're learning Marathi.
३२.	तुम्ही काय करताहात इथे?	What are you doing here?
	मी इतिहास संशोधन करतोय / करत्येय.	I'm doing historical research.

SENTENCES

F. ३३.	मुली आज दुपारी येतायत.	The girls are coming this afternoon.
३४.	मी संध्याकाळी तिथे जातोय / जात्येय.	I'm going there in the evening.
G. ३५.	तुमचा मुलगा शाळेत शिकतोय का ?	Is your son studying in school ?
	हो.	Yes.
	कितवीत आहे ?	What grade is he in ?
	चौथीत.	In the fourth grade.
३६.	तुमची मुलगी कितवीत आहे ?	What grade is your daughter in ?
	ती तिसरीत आहे.	She's in the third grade.
३७.	तुम्ही किती भावंडं ?	How many brothers and sisters are you ?
	सहा.	Six.
	तुम्ही कितवे ?	Which number are you ?
	पाचवा.	The fifth.

GRAMMAR

Formation of the informal imperfect B

This chapter presents a specialized fragment of the imperfect B, the full pattern of which is presented in the next chapter. The form presented here is used in informal speech for reference to action viewed as in progress in the present. Its nearest English equivalent is the present progressive* '*N* is *V*–ing.'

The informal imperfect B consists of the forms of the imperfect A plus the present auxiliary. In speech these forms are contracted, so to describe them we have to posit an underlying form and the modified form which is realized in actual speech. The underlying and spoken forms for all subject pronouns are given below.

Underlying form	Spoken form
मी *V*–तो आहे (*m.*)	मी *V*–तोय
मी *V*–ते आहे (*f.*)	मी *V*–त्येय
तू *V*–तो आहेस (*m.*)	तू *V*–तोयस
तू *V*–ते आहेस (*f.*)	तू *V*–त्येयस
तो *V*–तो आहे (*m.*)	तो *V*–तोय
ती *V*–ते आहे (*f.*)	ती *V*–त्येय
ते *V*– तं आहे (*n.*)	ते *V*–तंय
आम्ही *V*–तो आहेत / आहे	आम्ही *V*–तोयत / *V*-तोय
तुम्ही *V*–ता आहात / आहे	तुम्ही *V*–ताहात / *V*–ताय
ते, त्या, ती *V*–आहेत	ते, त्या, ती *V*–तायत

---

* This is sometimes called the present continuous.

The full paradigm of कर– is given as an example.

मी करतोय	I (*m.*) am doing
मी करत्येय	I (*f.*) am doing
तू करतोयस	you (*m.*) are doing
तू करत्येयस	you (*f.*) are doing
तो करतोय	he, it is doing
ती करत्येय	she, it is doing
ते करतंय	it is doing
आम्ही करतोयत/करतोय	we are doing
तुम्ही करताहात/करताय	you are doing
ते, त्या, ती करतायत	they are doing

Note that the pattern in the plural deviates from what we would expect, and that in the first and second plural we find variation. In the first person plural the underlying form is आहेत or आहे rather than the expected आहोत. In the second person, along with the expected आहात we also find आहे. (In both the first and second persons the आहे variant is the more common.) In the third person, instead of the expected *V*-तात आहेत we find *V*– त आहेत, which is simply a contraction of the regular imperfect B.

Though you may find this variation rather dismaying at first, these forms are so often used that they will soon seem familiar and not at all difficult.

In the example sentences in this chapter, the alternative forms given are the feminine.

Use of informal imperfect B

The informal imperfect B, as we have indicated above, is used for action going on in the present. See section A for examples. You will find this form useful for asking questions and eliciting vocabulary about the activities you see around you. Examples of such questions and answers are given in section B.

Telephone conversations normally open with a sentence in this pattern: **मी ________ बोलतोय / बोलत्येय.** See section C for examples.

This pattern is also frequently used in describing aches and pains and other symptoms of illness. See section D for examples.

In some cases the concept of the 'present' is expanded so much that it covers the habitual as well. In such cases the imperfect B is used almost interchangeably with the imperfect A. Note the two sentences below.

सुधीर हल्ली काय करतोय ?	What's Sudhir doing these days ?
सुधीर काय करतो ?	What does Sudhir do ?

Though, logically speaking, there is little difference between these two sentences, they are not completely equivalent. The first implies that the speaker knows the brother and simply wants to update his information. The second question does not imply any prior information; it is the question of a stranger. (Note that the English sentences show the same distinction of meaning.) See section E for more examples of the imperfect B used in a habitual sense.

Just as the imperfect B is in some cases almost interchangeable with the imperfect A, so with the verbs **जा**- and **ये**- the imperfect B and prospective overlap. See section F for examples.

Ordinal numbers

Though ordinal numbers have been used occasionally in this text, so far there has been no systematic explanation of them. Here are the ordinal numbers from one to ten.

पहिलं	first	सहावं	sixth
दुसरं	second	सातवं	seventh
तिसरं	third	आठवं	eighth
चौथं	fourth	नववं	ninth
पाचवं	fifth	दहावं	tenth

You can see that the first four are irregular, but from then on वं is simply added to the cardinal numbers.*

The ordinal numbers are all variable adjectives.

पहिली मुलगी	first daughter
दुसरा मुलगा	second son

Marathi has a special ordinal interrogative — कितवं. English has no exact equivalent of this, and has to make do with 'which' or 'which number' in asking about position in a series.

The ordinal interrogatives and ordinal numbers are used in talking about grades in school. कितवी इयत्ता means 'which grade.' The word इयत्ता, however, is generally dropped and simply कितवी is used. Note, though, that it retains the feminine gender of इयत्ता. To ask 'in what grade' one says कितवीत. The answer has the form पहिलीत, दुसरीत, तिसरीत, etc., or alternatively, पहिलीला, दुसरीला, तिसरीला, etc

See section G for the use of ordinal numbers.

Special detail

The form झालंय in sentence 10 is a contraction of झालं आहे, the perfect of हो- with the present auxiliary.

Vocabulary notes

1. There is considerable variation in usage regarding variable adverbs. Note नुसतं in sentence 7. Here it agrees with the object गप्पा so it has the feminine plural ending. However, it could also be made to agree with the subject.

---

* In the case of नववं of course, there is also the morphohonemic change of ऊ to व.

2. In many Marathi sentences the person is the receiver of the action rather than the agent. We see an example of this in sentence 23.

मला खोकला येतोय.	I have a cough ('a cough is coming to me').

3. A पेठ is a section of a city. In many places पेठा are named after the days of the week.

VOCABULARY

आवाज *m*. sound, noise
इयत्ता, इयत्ता *f*. grade in school
उडव– *v.t.* to fly (as a kite)
ओरड– *v.i.* to produce the cry characteristic of a particular animal or bird
कादंबरी, कादंबऱ्या *f*. novel
कितवं *interrog. adj*. which (regarding position in a series). **कितवी** which grade
कोकीळ, कोकीळ *m*. cuckoo
खुरपण *f*. (*i*) weeding. o **कर–** to weed
खोकला *m*. cough. o **ये–** to have a cough
गाढव, गाढवं *n*. donkey
घसा, घसे *m*. throat (inside). o **दुख–** to have a sore throat
झिमझिम *adv* lightly
तयार कर– to make, prepare
तोड– *v.t.* to pick, harvest
दुख– *v.i.* to hurt, ache
धुणं *n*. washing. o **धु–** to do the washing
नुसतं *adv. var*. only, just, merely
पकड– *v.t.* to catch
पतंग, पतंग *m*. kite. o **उडव–** to fly a kite
पत्ता, पत्ते *m*. card. **पत्ते खेळ–** to play cards
पाय, पाय *m*. foot, leg
पेठ, पेठा *f*.(*e*) section of a city
पेरू, पेरू *m*. guava
पोट, पोटं *n*. stomach, belly. **दुख–** to have a stomach ache
बांध– *v.t.* to build
बी.एस्सी *n*., *f*. Bachelor of Science degree
भिजव– *v.t.* to water, irrigate
मासा, मासे *m*. fish
लागण *f*.(*i*) planting o **कर–** to plant
वं *adj*. suffix used for forming ordinal numbers. Cf. Eng *th*
विशेष *adj. inv*. special
शोध– *v.t.* to look for, search for
संशोधन *n*. research. o **कर–** to do research

VOCABULARY

Given names

किसन	*m.* Kisan
नंदा	*f.* Nanda
मीना	*f.* Meena
ललिता	*f.* Lalita
सुधीर	*m.* Sudhir

Phrases

कशाचा आवाज	sound/noise of what
इतिहास-संशोधन	historical research
रविवार पेठेत	in Ravivar Peth
कितवीत	in what grade
तिसरीत	in the third grade
चौथीत	in the fourth grade

PRACTICE

A. Go through the full paradigm of the informal imperfect B with the following verbs and verb phrases.

१. कर-
२. ये-
३. जा-
४. पेपर वाच-
५. धुणं धु-
६. स्वैपाक कर-
